RNI NO. MAHMAR/2020/84035

कायदेविषयक मार्गदर्शन मोफत
संपर्क
अँड . सुशीला
मो नं 8766507294

BAHUJAN SAURABHA
# बहुजन सौरभ

दि. 8 फेब्रुवारी 2026



1923 डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे मुंबईला आगमन व महारांच्या सभेत भाषण.1934
मनमाड येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जाहीर सभा.
संकलन प्रा. यशवंत दुपटे

रविवार, ०८ फेब्रुवारी २०२६ | वर्ष : ६ | अंक : ४३ | दैनिक | किंमत : ₹ ५/-
Sunday, 08 February 2026 | Year : 6 | Issue : 43 | Daily | Rate: Rs. 5/-

# पञ्ञा मेत्ता संघच्या द्वितीय धम्मसंगोष्टीने वातावरण धम्ममय

**नागपूर :** पञ्ञा मेत्ता संघच्या वतीने शनिवार, दि 7 फेब्रुवारी 2026 रोजी इंदोरा, उत्तर नागपूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय कन्व्हेन्शन सेंटर येथे द्वितीय धम्मसंगोष्टी कार्यक्रम अत्यंत उत्साहात आणि धार्मिक भावनेने ओथंबलेल्या आध्यात्मिक वातावरणात झाला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान पूज्य भदंत संघरत्न माणके जी यांनी भूषविले.

बुद्ध धम्माचे सार : शिक्षण आणि आचरण या विषयावर आयोजित या धम्मसंगोष्टीत देश-विदेशातील प्रख्यात भिक्षू संघ आणि धम्म तज्ञांनी मार्गदर्शन केले. भारत, जपान आणि म्यानमार येथील मान्यवर भिक्षूंच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला आंतरराष्ट्रीय स्वरूप प्राप्त झाले.




कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी भदंत खोशो तानी (मुख्य पुजारी, सायकोजी विहार, गुणमा, जपान), भदंत शोझेन आराही (संचालक - इचिगु वो तेरासू उन्डो, उपक्रम, ह्योगो, जपान), भदंत शोताई योकोयामा (जनरल सेक्रेटरी, पीएमजे पञ्ञा मेत्ता संघ जपान समिती), भदंत ज्योखान ओनो (विहाराधिपती, फुगेनजी विहार, टोकियो), तसेच भिक्खुनी थीयू ओची (विहाराधिपती, हेंडोजी विहार, एहिमे, जपान) उपस्थित होते.

मुख्य भाषण प्रादेशिक उपायुक्त नागपूर डॉ. सिद्धार्थ गायकवाड यांनी केले. त्यांनी बुद्ध धम्माचे तत्वज्ञान समाजजीवनात आचरणात आणण्याचे महत्व अधोरेखित केले.

धम्म प्रवचन सत्रात भदंत डॉ. नंदरतन (श्रीलंका बौद्ध विहार, कुशीनगर, उत्तर प्रदेश) आणि उपासिका प्रा. डॉ. सॉ हातुत सॉंडर (महाप्रजापती गौतमी सुभारती स्कूल ऑफ बुद्धिझम स्टडीज, म्यानमार) यांनी बुद्धांच्या कालातीत शिक्षणावर सखोल मार्गदर्शन केले.

पञ्ञा मेत्ता संघा चे पदाधिकारी सदस्य यांच्या हस्ते पञ्ञा मेत्ता संघाचे अध्यक्ष पूज्य भदंत संघरत्न माणके जी यांचा गुलाब फुलांचा भव्य हार घालून स्वागत करण्यात आले. तसेच देश विदेशातील भिक्षू व अतिथी यांच्या हस्ते भंतेजी च्या जीवनावर तयार करण्यात आलेल्या भंतेजी ची जीवनी या पुस्तकीचे मान्यवरा द्वारे विमोचन करण्यात आले. सोबतच, महासमाधि विशेषांक पुस्तकाचे विमोचन करण्यात आले.

अध्यक्षीय भाषणात पूज्य भदंत संघरत्न माणके जी यांनी बुद्ध धम्माच्या साराचा अभ्यास, चिंतन आणि आचरण यांचा संगम घडवून आणण्याचे आवाहन केले. या धम्मसंगोष्टीला नागपूर शहर व परिसरातील मोठ्या संख्येने धम्मप्रेमी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी पञ्ञा मेत्ता संघच्या पदाधिकाऱ्यांनी व स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाची सांगता मंगल मैत्री प्रार्थनेने करण्यात आली.

# नागपूरजवळ अदानींचा 70 हजार कोटींचा मेगाप्रकल्प

## 30 हजार जणांना देणार रोजगार

**नागपूर:** नागपूरजवळील कळमेश्वर तालुक्यातील लिंगा येथे अदानी कंपनीतर्फे एकात्मिक कोळसा गॅसिफिकेशन आणि डाउनस्ट्रीम डेरिव्हेटिव्हज कॉम्प्लेक्स उभारण्यात येत आहे. यासाठी 70 हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात येत आहे. या प्रकल्पामुळे 30 हजार लोकांना प्रत्यक्ष रोजगार मिळेल, अशी माहिती अदानी एअरपोर्ट्सचे संचालक आणि अदानी डिजिटल लॅब्सचे प्रमुख जीत अदानी यांनी येथे दिली.

हा प्रकल्प नागपूरला स्वच्छ ऊर्जा तंत्रज्ञानाच्या जागतिक नकाशावर ठळक स्थान मिळवून देईल आणि भारताच्या ऊर्जा आत्मनिर्भरतेला अधिक बळकटी देईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. असोसिएशन फॉर इंडस्ट्रियल डेव्हलपमेंटच्या वतीने आयोजित



खासदार औद्योगिक महोत्सव-ॲडव्हांटेज विदर्भ-2026 मध्ये जीत अदानी यांनी सांगितले की, अदानी समूह महाराष्ट्राच्या वीज गरजा पूर्ण करण्यासाठी कटिबद्ध आहे. येथे अदानी समूह तिरोडा प्रकल्पात 3,300 मेगावॅट क्षमतेचा अत्याधुनिक सुपरक्रिटिकल वीज प्रकल्प चालवत आहे. तसेच नागपूरलगत असलेल्या बुटीबोरी येथे 600 मेगावॅट क्षमतेचा बुटीबोरी वीज प्रकल्प पुन्हा सुरू करून समूहाने पायाभूत सुविधा अधिक मजबूत केल्य आहेत. वीजपुरवठ्याबाबत बोलायचे झाल्यास, अदानी समूह महाराष्ट्रात एकूण 6,600 मेगावॅट वीजपुरवठा करत आहे, जी राज्यातील उद्योग आणि डिजिटल अर्थव्यवस्थेचा कणा मानली जाते. विदर्भाला भारताच्या लॉजिस्टिक्स गेटवे म्हणून स्थापित करण्यासाठी अदाणी समूह अनेक आघाड्यांवर काम करत आहे. मिहान येथील एमआरओ हब हा एक महत्वाचा प्रकल्प आहे. मिहानमध्ये 30 एकरांवर उभारलेले एमआरओ (देखभाल, दुरुस्ती आणि ओव्हरहॉल) संकुल आता आंतरराष्ट्रीय केंद्र म्हणून विकसित होत आहे. दुसऱ्या बाजूला बोरखेडी एमआयसीडीबाबत बोलायचे झाल्यास, 75 एकरांवर पसरलेले हे केंद्र मालवाहतुकीचा खर्च कमी करण्यास आणि निर्यात वाढविण्यास मदत करत आहे.

# बिहारमध्ये मध्यान्ह भोजनानंतर 70 मुलांची प्रकृती बिघडली

**पाटणा :** बिहारच्या मधेपुरा जिल्ह्यात मध्यान्ह भोजनानंतर मोठी खळबळ उडाली आहे. शाळेत शनिवारी जेवल्यानंतर 70 हून अधिक मुलांची प्रकृती अचानक बिघडली. जेवणानंतर काही वेळातच मुलांना उलट्या, पोटदुखी आणि अस्वस्थता जाणवू लागली. मुलांची प्रकृती बिघडत असल्याचं पाहून शाळा परिसरात एकच गोंधळ आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले.

शिक्षकांनी तातडीने याची माहिती स्थानिक प्रशासन आणि आरोग्य विभागाला दिली. मिळालेल्या माहितीनुसार, माध्यान्ह भोजनात पाल पडल्याची शक्यता वर्तवली जात आहे,



ज्यामुळे मुलांची प्रकृती बिघडली. मात्र याला अधिकृत दुजोरा तपासणीनंतरच मिळू शकेल. आजारी मुलांना रुग्णवाहिका आणि खाजगी वाहनांच्या मदतीने मधेपुरा सदर रुग्णालयात नेण्यात आले. रुग्णालयात पोहोचताच डॉक्टरांच्या पथकाने मुलांवर उपचार सुरू केले. डॉक्टरांनी दिलेल्या माहितीनुसार, बहुतांश मुलांची प्रकृती आता स्थिर असून ते धोक्याबाहेर आहेत. मात्र, उपचारादरम्यान एका मुलीची प्रकृती गंभीर असल्याचे सांगण्यात येत असून तिला विशेष निरीक्षणाखाली ठेवण्यात आले आहे. रुग्णालयात मुलांच्या पालकांनीही मोठी गर्दी केली होती, ज्यामुळे तिथे चिंतेचे वातावरण पाहायला मिळाले.

मिळालेल्या माहितीनुसार, शाळेत मध्यान्ह भोजन एका एनजीओजच्या माध्यमातून पुरवण्यात आलं होतं. जेवण वाटप केल्यानंतर लगेचच मुलांमध्ये आजारपणाची लक्षणं दिसू लागली. या घटनेने पुन्हा एकदा मध्यान्ह भोजनाचा दर्जा आणि देखरेख यंत्रणेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

# रजत वर्षानिमित्त मागासवर्गीय कृषि कर्मचारी/अधिकारी महासंघाचे आज 5 वे राज्यस्तरीय अधिवेशन अमरावतीत

**नागपूर :** रजत वर्षाच्या विशेष पर्वावर मागासवर्गीय कृषि कर्मचारी/अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने 5 वे राज्यस्तरीय अधिवेशन आज अमरावती येथे आयोजित करण्यात आले आहे.

कृषि विभागात कार्यरत मागासवर्गीय कर्मचारी व अधिकारी यांची एक स्वतंत्र राज्यस्तरीय संघटना असावी, तसेच त्यांच्यावर होणारे अन्याय, अत्याचार याविरोधात संघटितपणे लढा देता यावा आणि समाजातील विविध घटकांपर्यंत कृषि विभागाच्या योजना प्रभावीपणे पोहोचाव्यात, या उद्देशाने या राज्यस्तरीय महासंघाची स्थापना करण्यात आली आहे. राज्यव्यापी मागासवर्गीय कर्मचारी व अधिकारी महासंघाचा जन्म 1986 मध्ये झाला. स्थापनेपासून आजपर्यंत या महासंघाची वाटचाल अखंडितपणे सुरू असून, संघटना सातत्याने कार्यरत आहे. 40 वर्षांपूर्वी लावलेले हे रोपटे आज वटवृक्षात रूपांतरित झाले आहे.

महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमधील अधिकारी व कर्मचारी या महासंघाचे सदस्य असून, राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात महासंघाच्या शाखा कार्यरत आहेत. क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शाहू महाराज यांच्या क्रांतीकारी विचारांच्या प्रेरणेतून मागासवर्गीय कर्मचारी व अधिकारी यांच्या प्रश्नांना सामूहिकरीत्या तोंड देण्याचे कार्य ही संघटना करत आहे. हे वर्ष महासंघाचे रजत वर्ष असून, त्यानिमित्त पवित्र गाडगे महाराजांची पावनभूमी व डॉ. पंजाबराव देशमुख यांची कर्मभूमी असलेल्या अमरावती येथे 5 वे राज्यस्तरीय अधिवेशन रविवार दिनांक 8 फेब्रुवारी 2026, सकाळी 10 :00 कल्पदिप मंगलम रहाटगाव रिंग रोड, जिल्हा संपन्न होत आहे. मागासवर्गीय कर्मचारी व अधिकाऱ्यांमध्ये एकता निर्माण करणे, शोषण, अन्याय व अत्याचाराविरोधात लढण्यासाठी त्यांना संघटित करणे, आंबेडकरी विचार व संस्कृती रुजविणे, व्यक्तिमत्व विकास व कार्यक्षमता वाढविणे, संघटना बळकट करून आंबेडकरी तत्वज्ञान मांडणे, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व वैचारिक पातळी उंचावणे, अन्यायाविरोधात संसदीय मार्गाने आंदोलन करणे, तसेच समाजातील विविध घटकांपर्यंत व तळगाळातील शेतकऱ्यांपर्यंत कृषि विभागाच्या योजना पोहोचविण्यास मदत करणे. ध्येय-उद्दिष्टांचा परिणाम म्हणून, कृषि खात्यात कार्यरत कोणत्याही मागासवर्गीय कर्मचारी अथवा अधिकाऱ्यावर तो कोणत्याही जाती-धर्माचा असो अन्याय झाल्यास, महासंघाने त्याला न्याय मिळवून देण्यासाठी नेहमीच प्रामाणिक प्रयत्न केले आहेत.

येणारा काळ कृषि विभागातील मागासवर्गीय कर्मचारी व अधिकाऱ्यांसाठी अत्यंत कसोटीचा ठरणार आहे. एकटा कर्मचारी अथवा अधिकारी अन्यायाविरोधात प्रभावीपणे लढू शकत नाही. संघटनेची शक्ती पाठीशी असल्याशिवाय अन्यायाला खऱ्या अर्थाने वाचा फुटू शकत नाही. त्यामुळे महाराष्ट्रातील सर्व मागासवर्गीय कृषि कर्मचारी व अधिकाऱ्यांनी महासंघात सहभागी होऊन सभासदत्व स्वीकारावे व संघटनेचे कार्य अधिक प्रभावी करावे, असे मत महासंघाचे अध्यक्ष, राजेश्वर शिरसाट यांनी व्यक्त केले आहे. या पार्श्वभूमीवर, रजतवर्षीय 5 वे राज्यस्तरीय अधिवेशन यशस्वी करण्यासाठी महासंघाचे सर्व जुने व नवे सभासद उपस्थित राहावेत, असे आवाहन अध्यक्षांनी केले आहे.

या अधिवेशनाच्या यशस्वी आयोजनासाठी महासंघाचे महासचिव रवींद्र मानवटकर, संयोजक संजय भगत, महेंद्र बसवनाथे, सहसंयोजक आनंद मून, महेंद्र गजभिये, दिलीप मेश्राम, व अरविंद दिवे यांनी विशेष परिश्रम घेतले आहेत. तरी सर्व सभासदांनी या अधिवेशनास मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपला सहभाग नोंदवावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# 31 मार्चपर्यंत नक्षलवाद हद्दपार

**गडचिरोली :** जिल्ह्याच्या सीमेवर नक्षलवाद्यांविरुद्ध केलेल्या कारवाईत सुरक्षा दलांना यश आले असून, 'कंपनी क्रमांक 10' चा म्होरक्या प्रभाकर याच्यासह सात जहाल नक्षलवाद्यांचा खात्मा करण्यात आला आहे. तीन दिवस आणि तीन रात्री चाललेल्या या थरारक चकमकीनंतर नक्षलवाद्यांचे कंबरडे मोडले असून, 31 मार्चपर्यंत जिल्ह्याचे नक्षलवादातून समूळ उच्चाटन करण्याचा निर्धार गडचिरोलीचे पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केला. छत्तीसगड आणि भामरागड तालुक्याच्या सीमावर्ती भागात झालेल्या या चकमकीत पोलिसांनी 5 हजार राऊंड फायर करत नक्षल्यांचे गड उद्ध्वस्त केले. नक्षल्यांच्या बाजूनेही 1 हजार राऊंड डागण्यात आले. या चकमकीत सी-60 पथकाचे जवान दीपक मडावी यांनी वीरमरण आले.

परिचय मेळावा



बुद्धिस्ट मंगल परिणय तर्फे दि. 28 डिसेंबर 2025 रोजी वधू-वर परिचय मेळावा घेण्यात येत आहे. इजिं (IIT), MBA (IIM)
बँक अधिकारी, रेल्वे, Gort / Pvt, बिझिनेस,
व इतर भरपूर स्थळे उपलब्ध (बुकिंग सुरु)
संपर्क : सौ सुनंदा वासे
मनिषनगर, नागपूर, 9371037407/9373210249

वाढदिवसाच्या आभाळभर शुभेच्छा...
अन्मय उर्फ अव्युक्त






मी अन्मय, मृन्मयी अनंता रक्षक बोलतो,
शब्द थोडे अडखळतात,
पण मनातून मी सांगतो।
शाळेत माझे गुरूजन, मित्र सारे मिळून,
मला अव्युक्त म्हणतात, प्रेमाने हसून।
आठ फेब्रुवारी, खास तो दिवस आला,
माझा पाचवा वाढदिवस, आनंद उधळून गेला।
वय वाढलंय थोडंसं, समजही येऊ लागली,
चूक-बरोबराची जाणीव, हळूहळू जागली।
कधी रागवतो, कधी रुसतो, कधी खुलून हसतो,
बालमनाच्या लाटांवर रोज नवा रंग बसतो।
बप्पा, आजी, आई, बाबा, नानू, मम्मा सारे,
माझे लाड पुरवताना थकले नाहीत कधीच हे प्यारे।
म्हणून कधी हट्टी होतो, चुकतो मी लहानसा,
काय बरोबर, काय चूक हे कळत नाही मला तसा।
पण रागामागे लपलेलं प्रेम मला शिकवतं,
सु-संस्कारांची शिदोरी माझं आयुष्य घडवतं।
आता कळलं वाढदिवस म्हणजे फक्त धूमधडाका नव्हे,
खाणे-पिणे, गोंगाट यातच त्याचं मोल नाही रे।
मोठ्यांचे आशिर्वाद, प्रेमाची साथ,
याच्यावर उभी राहते माझ्या उद्याची वाट।
तुमचे संस्कार, तुमचे आशिर्वाद,
मी जपेन आयुष्यभर, हीच माझी साद।
ग्वाही देतो आज तुम्हाला, मनापासून सारे,
जयगुरू म्हणत नतमस्तक होतो, लहानसे हात जोडून प्यारे।
तुमचाच लाडला, अन्मय

दैनिक बहुजन सौरभ परिवार



शिका, संघटीत व्हा, संघर्ष करा

मागासवर्गीय कृषि कर्मचारी व अधिकारी महासंघ महाराष्ट्र राज्य, पुणे
मुख्यालय - नागपूर

निमंत्रण

५ वे राज्यस्तरीय अधिवेशन २०२६

रविवार, दि. ८ फेब्रुवारी २०२६ । सकाळी १० वाजता

-: स्थळ :-
कल्पदीप मंगलम
रहाटगांव रिंग रोड, रहाटगांव, जि. अमरावती

- विनीत -
मागासवर्गीय कृषि कर्मचारी व अधिकारी महासंघ महाराष्ट्र राज्य, पुणे
मुख्यालय - नागपूर
(संलग्न : कास्ट्राईब कर्मचारी महासंघ, महाराष्ट्र राज्य, पंजियन क्र. एनजीपी २०८४)
मुख्य कार्यालय : एम. जी. खोब्रागडे, गौतम अपार्टमेंट, १६१, अंबाझरी ले-आऊट, हिलटॉप, नागपूर - ४४० ०३३

अत्त दीप भव

दि. ८ फेब्रुवारी २०२६, सातवे स्मरण

अभियान हुमणे (आयंश)

एका प्रकाशकिरणाची प्रेरणादायी हृद्यस्मृती!



तुझे प्रेम, औदार्य, त्याग,
नम्रता, परिश्रम व सेवा
आमच्या साठी
प्रेरणास्त्रोत आहेत.

Reality is constructed by the world which is audible and visible to us.

- ABHIYAN
(1976-2019)

आई, बाबा,
सर्व नातलग, मित्र मंडळी
आणि नालंदा अभियान ट्रस्ट परिवार, वर्धा

# स्वातंत्र्य आंदोलन सुरू करताना काँग्रेस चरित्राची शव परीक्षा आवश्यक !

गुलामी विरुद्ध लढा यशस्वी करायचा असेल तर मोर्चे बांधणी करावी लागेल. गुलाम करणारा घटक म्हणजे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भाजप परिवाराने नरेंद्र मोदी यांना प्रधानमंत्री बनवण्याचे बहाण्याने सम्राट बनवले. मोहन भागवत हे राज पुरोहित किंवा त्यांचे प्रधानमंत्री, अमित शहा ज्यांना तडीपार करण्यात आले होते त्यांना गृहमंत्री केले, ते त्यांचे सरसेनापती म्हणुया. त्यांचे वर्तन संविधान निष्ठ प्रधानमंत्री म्हणून राहिलेले नाही. ते राजा किंवा सम्राट सारखे वर्तन राहीले आहे. तो विषय यावेळी चर्चेचा नाही. मोदी वर्तन राजाप्रमाणे आहे एवढेच नमूद करायचे होते. या मोदींचे राजेशाही विरुद्ध लढण्याचा निर्धार देशाला करावाच लागेल. त्यासाठी देशाची सर्वात जुनी, देशव्यापी, स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व करणारी काँग्रेस पार्टी आहे आणि तिला सोबत घेतल्याशिवाय हा लढा यशस्वी होऊ शकत नाही. परंतु काँग्रेस बद्दल प्रतिकूल मते देखील वेळोवेळी आपण व्यक्त करीत आलेलो आहोत. ती टीका वास्तव देखील आहे. त्यामुळे काँग्रेस चरित्र स्पष्ट करणे देखील आवश्यक आहे. त्याशिवाय गैरसमज दूर करून संघटित लढा उभा होऊ शकत नाही.

**काँग्रेस संघटना स्वातंत्र्य लढा लढण्यासाठी स्थापन :-** 1885 साली मुंबईत अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेस स्थापन करण्यात आली होती. ब्रिटिशांचे विरुद्ध ते आंदोलन होते. त्या मध्ये जहाल आणि मवाळ असे दोन प्रवाह होते. तसे सशस्त्र आणि अहिंसक असे दोन मत प्रवाह होते. बाळ गंगाधर टिळक हे जहाल गटाचे नेते होते. नेताजी सुभाषचंद्र बोस हे साम्यवादी होते. ते सशस्त्र लढाई लढणारे होते. आजचा राष्ट्रीय स्वयंसेवक संघ याची नाळ टिळक यांचेसोबत आहे. नेताजींची नाळ कम्युनिस्ट विचारासोबत आहे. मवाळ गटाचे नेते गोखलेनंतर पुढे गांधीजी, पंडित नेहरू होते. नेताजींनी आझाद हिंद सेना निर्माण केली. आज नेताजी फॉरवर्ड ब्लॉक नेतृत्वाचा वारसा आहे. टिळक मेल्यानंतर ते नेतृत्व विनायक सावरकर यांचेकडे आले. हिंदू महासभा त्यांची संघटना होती. आज संघ भाजपकडे आहे. काँग्रेस नेतृत्व गांधीजी, नेहरू आणि सरदार पटेल यांचेकडे होते. आज सोनिया गांधी, राहुल गांधी आणि खरगे यांचेकडे आहे.

**टिळक विचार :-** पेशव्यांचे राज्य समर्थक किंवा त्यांची भक्ती करणारे टिळक आणि त्यांचे सहकारी होते. हिंदू राष्ट्र, चातूर्वर्ण व्यवस्था, ब्राम्हणी राज्य, अस्पृष्यता व जातीयतेचे, स्त्री दास्य या सर्व जीर्ण रूढी परंपरा यांचे आंधळे समर्थन करणारे म्हणजे टिळक आणि त्यांचे सहकारी. आज राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भाजप व परिवार त्यांची चळवळ चालवतात. हाच वर्ग संविधान आणि लोकशाही विरोधी प्रतिक्रांती करून हुकूमशाही सत्ता प्रस्थापित करीत आहे. त्या विरुद्ध आपण जनजागृती केली पाहिजे. यातील दोन प्रवाह आंबेडकरी विचारांचे जवळ-जवळ येतात. मत




भिन्नता आहे हे मान्य करून संघ भाजपपेक्षा जवळ आहेत हे मात्र खरे आहे. त्यातही साम्यवाद, समाजवाद बराच जवळ आहे. ते संघापासून लांब आहेत. काही अपवाद आहेत ते आंबेडकरी चळवळीतही आहेतच. पण काँग्रेसी जसा सकाळी भाजपमध्ये जाईल आणि सायं. परत काँग्रेसमध्ये येईल, याप्रमाणे मार्क्स आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते नाहीत. परंतु या धर्मांधतेच्या वादळात मार्क्स आंबेडकरी चळवळीचा जनाधार कमी झाला. या दोन्ही चळवळी कमजोर करण्यात काँग्रेस अग्रेसर होती. नंतर संघाने काँग्रेस कमजोर करण्याची प्रक्रिया तेज केली. ते काँग्रेसच्या लक्षात आले नाही.

**काँग्रेस राजकीय धंदा करणाऱ्यांचा पक्ष झाला :-** प्रत्येक तालुक्यात, जिल्ह्यात असे धन दांडके नेते काँग्रेसचे नेतृत्व करीत होते. त्यांना जनतेच्या आणि देशाच्या समस्या सोबत काही देणे घेणे नव्हते. ते लोकांचे दमन करायचे. गुंडागर्दी करून आपला धाक त्यांनी निर्माण केला होता. मतदार त्यांची लाचारी करीत होती. ते एक टोळी नायक झाले होते. त्यांचे कार्यकर्ते, त्यांचे टोळीतील गुंड होते. त्यांना वैचारिकता काही एक उरली नव्हती असे घराने देशभर काँग्रेस पक्ष

लेखांक 145



अशोक सरस्वती बोधी
मो. 8530980741

चालवत आहे. तेथे सत्ता प्राप्त होत होती. परंतु खालचे पातळीवर त्याचा काही उपयोग नव्हता. गरीब घरातील विद्वान, कर्तबगार, हरहुन्नरी कार्यकर्ता खुडल्या गेलेत. एकाच घरात काँग्रेस सत्ता मर्यादित झाली. त्यांनी नेतृत्वाला खुनवणे सुरू केले. गटबाजी चव्हाट्यावर आली. भ्रष्टाचार त्यांचा शिष्टाचार झाला. नैतिकता नावा पुरती उरली. जातीय, धर्मांध मानसिकता जपणारे प्रतिगामी लोक दलित, आदिवासी समाजाचे दुःख वाढवत होते. संघ त्यावर नजर ठेऊन काँग्रेस पक्षातील ही प्रतिगामी लोक संघ आणि जनसंघ आजच्या भाजपचा कच्चा माल होता. अशी कार्यकर्ता मंडळी भाजपसाठी उपयुक्त ठरत होती. आज भाजप जी वाढली ती काँग्रेस कार्यकर्त्यांमुळे. ज्यांना काँग्रेसने मोठे केले तेच काँग्रेसला गाडण्याचा प्रयत्न करीत होते. आज त्याच नेत्यांनी काँग्रेसला सत्तेपासून वंचित केले. जिकडे सत्ता तिथे ही भ्रष्ट नेते आपले बस्तान मांडू लागले. पक्ष बदल करणे यांना काहीच वाईट वाटत नव्हते. काँग्रेस भाजप अश्या भटक्या भ्रष्ट लोकांना आपल्या पक्षात घेण्यासाठी नेहमी पुष्प हार घेऊन तयारच होती.

**अराजक निर्माण झाले :-** राष्ट्रीय स्वयंसेवक संघ देशात अराजक निर्माण करण्यासाठी टपून होता. त्यांनी आज हळूहळू अराजक निर्माण केले. आज भाजपने आपला डेरा इतका जमवला की देश हुकूमशाही मार्गाने वळला. सत्तेच्या नशेत काँग्रेस नेते विसरून गेले होते की देशात सामाजिक आणि आर्थिक विषमता नष्ट झाल्याशिवाय राजकीय लोकशाही मजबूत होऊ शकत नाही. ज्या विश्वासाने लोकांनी काँग्रेसला सत्तेत बसवले तो विश्वास तुटल्या गेला. त्यामुळे लोक भ्रमिष्ट झालेत. ते विकल्या जाऊ लागले. त्यांना स्वतःला विकण्याची संवय लागली. भाजप काँग्रेस त्या लोकांची मते, त्यांचे स्वातंत्र्य खरेदी करू लागले.

**आज काँग्रेस निराधार झाली :-** आज परिस्थिती अशी निर्माण झाली की काँग्रेसच्याच लोकांनी काँग्रेस निराधार केली. ज्यांना ज्यांना काँग्रेसने मोठे केले त्यांनीच काँग्रेसला हानी पोहचविली. आज काँग्रेस दलित आणि मुसलमान यांचा जनाधार शोधत आहे.

**राहुल गांधी यांचे वेगळेपण :-** राजकारण टिकून ठेवण्यासाठी बहुसंख्य लोकांना नाराज करता येत नाही. हिंदू लोकांना हिंदू राष्ट्र निर्माण करण्यासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे लोक उद्दिपित करतात. लोक भावनेत वाहात जातात. म्हणून काँग्रेस हिंदूंचे दबावात मार्ग सोडतात. राहुल गांधी देखील त्याला अपवाद नाहीत. आपल्या गळ्यातील जानवे दाखवणे हे त्यांनी हिंदू समोर केलेली शरणागती आहे. हाताला धागे बांधणे हे देखील त्याच राजकारणाचा भाग आहे. हे जुन्या काँग्रेस नेत्यांच्या दबावात केलेली ही कृती होती. परंतु राहुल गांधी जुन्या पठडीतील नेता नाही. ते नेतागीरीचे सोंग करीत नाहीत. सामान्य व्यक्तीप्रमाणे पोशाख करतात. ते प्रथम काँग्रेस राष्ट्रीय नेता आहे जे संघावर सरळ हमला करतात. त्यामुळे त्यांचे पक्षातील जुने नेते त्यांना सहकार्य करीत नाहीत. ही काँग्रेसची प्रगतिशील मार्गाने चाललेली धडपड दाखवीत आहे. त्यामुळे प्रगतिशील लोक राहुल गांधी यांना बळ देत आहेत.

**हुकूमशाही विरुद्ध आंदोलनात काँग्रेस सोबत येत आहे ! :-** भागवत - मोदी - शहा हुकूमशाही विरोधी आंदोलनाचे बळ केवळ दलित - मुसलमान - कम्युनिस्ट होऊ शकत नाहीत. म्हणूनच काँग्रेस सोबत असल्याशिवाय दुसरा पर्याय नाही हे मार्क्स आंबेडकरी कार्यकर्त्यांनी समजून घेणे आवश्यक आहे. क्रमशः ■ ■

# चूक कोणाची ?

## मन सुन्न करणारी कादंबरी




**लेखिका, कवयित्री, ब्लॉग रायटर वर्षा पतके थोटे यांची ‘चूक कोणाची?’ ही कादंबरी वाचली. ती वाचून ठेवून देणे योग्य वाटले नाही. त्याविषयी व्यक्त होणे गरजेचे वाटले म्हणून हा प्रपंच. काळ बदलला, वर्ष लोटली. आपण कितीही पुरोगामित्वाचे झेंडे मिरवित असलो तरी ‘जात वास्तव’ हा प्रतिष्ठेचा आणि सामाजिक उतरंडीचा मुख्य मुद्दा आजही आहे. अनेक महिला, मुली खोट्या प्रतिष्ठेला बळी पडताना दिसतात.**

‘चूक कोणाची?’ या कादंबरीच्या निमित्ताने हा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. जात, धर्म, पंथ या साखळदंडाने मानवाला इतकें जकडून ठेवले की, त्यासाठी पोटच्या लेकीचे सुख कशात आहे, हेसुद्धा पालक जाणीवपूर्वक विसरून जातात. जेव्हा सर्व संपून जाते तेव्हा ‘चूक कोणाची?’ या प्रश्नाभोवती मन घिरट्या घालते. याच समाज वास्तवाचे वेधक चित्रण मांडण्याचा प्रयत्न लेखिकेने प्रस्तुत कादंबरीतून केला आहे.

शामला - या कादंबरीची नायिका. पेशाने शिक्षक असलेल्या शामराव आणि आई बानाई या दाम्पत्याची अभिजात सौंदर्य लाभलेली एकुलती एक देखणी लेक. कोवळ्या वयात शाळेतील अन्यजातीय मुलाच्या प्रेमात पडते. गावात चर्चेचं वादळ उठते. ते घोंगावत शामराव आणि बानाई यांच्यापर्यंत येते. मुलगी सजातीयतेर मुलासोबत पळून जाईल, त्याच्याशी विवाह बंधनात अडकेल, समाजात आपली अब्रू जाईल, नाचक्की होईल, मान- सन्मान आणि प्रतिष्ठेला तडा जाईल या भीतीपोटी शामलाचे लग्न तिला न विचारता, किंबहुना विश्वासात न घेता, अत्यंत कूरूप सजातीय तरुणाशी करून देतात. शासकीय नोकरी ही एकच जमेची बाजू त्यांच्याकडे असते. डोळ्यात आसवलेला समुद्र, प्रियकराच्या विरह वेदना, आपल्यावर अपार प्रेम करणाऱ्या आईवडीलांनी असे का करावे ? असे असंख्य प्रश्न, वेदना उरी कवटाळून गपगुमान ती दिल्या घरी नांदायला जाते. हे कथाबीज घेऊन कादंबरी पुढे सरकते. संसार सुखाचा नसतोच मुळात. व्यक्त होणं ज्याला माहीत नाही, प्रेम म्हणजे काय ज्याला ठाउक नाही, स्वभावाने उथळ, अबोल, संशयी नवऱ्याचा संसार शामला अक्षरशः रेटत नेते. सासरी असलेला जाच, अडचणी माहेरी सांगून आई-वडीलांना दुःख द्यायचे नाही. आपले आपण सोसायचे. स्त्री मनावर बिंबवलेला संस्कार. या संस्कारात वाढलेली शामला आपल्या अंतःकरणात पेटलेला जाळ अंगणातील तुळशीजवळ शांतवते. कथानकात अनिल म्हणजे शामलाचा नवरा किशोर ह्याचा मित्र. स्वभावाने मोकळाढाकळा, जीवाला जीव लावणारा आणि नात्याची गरिमा राखणारा. अमराठी प्रदेशात आपले म्हणावे असे कूणी नसताना भावाचे नाते ती त्याच्यात शोधते. मात्र किशोरच्या मनात संशयाचे मोहोळ उठते. संशयाने पुरता पछाडलेला किशोर व्यसनाधीन होतो. बायकोचा शारीरिक, मानसिक छळ इतका पराकोटीचा असतो की, शामलाचे पुढे काय होईल? पूर्णत्वास जाईल का तिचा संसार की ते विभक्त होतील. वाचकाची उत्कंठा वाढत जाते. उत्सुकतेने वाचक पुढे पुढे सरकत जातो आणि मन सुन्न करणाऱ्या त्या अंतिमाजवळ येऊन थांबतो. येथे वाचक क्षणभर स्तब्ध होतो. किशोरला झालेली अटक, कोर्ट कचेरी, तिच्या वडिलांचा मृत्यू, किशोरला शिक्षा व्हावी या ध्येयाने पछाडलेली बानाई, शामलाचा मुलगा सुरज असा पट विस्तारत लेखिका खुबीने पुढे जाते आणि चूक कूणाची? किशोरची? समाजाची? विवाहसंस्थेची की, खोट्या प्रतिष्ठेची? या प्रश्नांची उत्तरे वाचकांवर सोडून कादंबरी विराम घेते.कादंबरीत वऱ्हाडी बोली भाषेचा, म्हणींचा चपखल शब्दप्रयोग करून पात्रात जिवंतपणा आणण्यात लेखिका कमालीची यशस्वी झाली आहे. काळानुसार लोप पावलेले मुकाबैध, हेळदिमाख, हिंदान, हेड्या म्हणजे लग्न जुळवणारा मध्यस्ती यासारखे अस्सल वऱ्हाडी शब्द या कादंबरीत वाचायला मिळतात. एकप्रकारे बोलीभाषा जीवंत ठेवण्याचं कार्य या कादंबरी लेखनाच्या निमित्ताने केलह्य आहे. वर्षा पतके थोटे यांची ‘चूक कूणाची ?’ ही पहिलीच कादंबरी. पहिलटकरीणीच्या खुणा काही ठिकाणी जाणवतात. त्यामुळे लेखन काहीवेळ अपरिपक्व वाटण्याची शक्यता गाढ होते. असे असले तरी ते एका उर्मीतून आले असल्याने अस्सल वाटते. चूक कोणाची? ही वऱ्हाडातील एका शामलाचा गुदमर नसून अशा अनेक मुली खोट्या सामाजिक प्रतिष्ठेला बळी पडताना दिसतात. त्यामुळे ही कादंबरी एकवल्ली नाही तर काळाचे प्रतिनिधित्व करणारी ठरते. तसेच लोकं, समाज काय म्हणेल यापेक्षा मुलीचा आनंद, सुख कशात आहे हे ओळखणे गरजेचे आहे, असा संदेश देणारीसुद्धा ही कादंबरी देते. जेष्ठ कथाकार सुरेश आकोटकर यांची प्रस्तावना व दा.गो.काळे यांचे मार्गदर्शन लाभलेल्या प्रस्तुत कादंबरीला सुप्रसिद्ध कादंबरीकार विजया ब्राम्हणकर यांची पाठराखण आहे. शिर्षकाला साजेसे मुखपृष्ठ मनोज थोटे यांच्या कल्पनेतून साकारलं आहे. यामुळे कादंबरीला देखणं प्रारूप प्राप्त झालं आहे. मधुश्री प्रकाशन पुणे यांनी प्रकाशित केलेली कादंबरी निश्चितच वाचनीय आहे. ■ ■



सुजाता लोखंडे,
मो 9730687374

# संविधान जागर लघु नाटकाच्या 150 प्रयोगपूर्तीचा सत्कार सोहळा...




संथागार फाउंडेशन आणि 1942 अखिल भारतीय महिला क्रांती परिषद अमृत महोत्सव परिषद समिती आयोजित ‘परिसंवाद’ ‘भारतीय संविधान आणि बौद्ध धम्म’ तद्वतच संविधान जागर लघु नाट्याचे ‘150 प्रयोगपूर्ती’ प्रित्यर्थ नाट्य कलावंतांचा सन्मान सोहळा डॉ. आंबेडकर सभागृह, ऊर्वेला कॉलनी, नागपूर येथे मोठ्या थाटात संपन्न झाला. अत्यंत नेटका एकापेक्षा एक विषयाला धरून सरस बोलणारे अध्यक्ष डॉ. सिद्धार्थ गायकवाड, डॉ. नीरज बोधी, अहमदाबादचे रमेश बँकर, या व्यक्तिमत्वांच्या वक्तव्यांनी कार्यक्रमाची गरिमा निश्चितच वाढलेली होती. सुरुवातीला सावित्री आईवर कविता पद्मा बहादुरे यांनी प्रस्तुत केली. संविधान प्रस्ताविकेचे वाचन प्राचार्य पुष्पा सोमकूंवर यांनी केले. डॉ. वीणा राऊत यांनी प्रास्ताविकातून संथागार फाउंडेशनशी झालेला सामाजिक परिचय आणि 1942 महिला क्रांती अमृत महोत्सव परिषदेसाठी तब्बल सहा महिने परिश्रम घेतलेल्या प्रवासात डॉ. एम एस जांभूळे, डॉ.सरोज आगलावे, पुष्पाताई बौद्ध, डॉ. वीणा राऊत, प्रा. विशाखा कासारे, प्रा.माधुरी गायधनी, इंजि. सुषमा भड, ममता बोदिले, मंगला जांभुळे, प्रा. सी.एन. हातमोडे, वंदना वनकर, भैय्याजी खैरकर, सचिन मून, लॉर्ड बुद्धाची राबणारी टीम तद्वतच तीन दिवसीय नागपूरच्या दीक्षाभूमीवर झालेल्या 1942 अखिल भारतीय महिला क्रांती अमृत महोत्सव परिषदेचा इतिवृत्त लिहिणाऱ्या डॉ.सरोज डांगे आणि प्राचार्य संध्या राजुरकर तदनंतर संघटनेशी जुळलेले डॉ. मनीष वानखेडे या सर्वांच्या कार्याचा लेखाजोखा प्रस्तुत करून 1942 अमृत महोत्सव समितीचा यशस्वी प्रवास आणि संवाद शैली सांभाळली. हा 1942 महिला क्रांती परिषदेचा गौरव होता. बौद्धांनी बौद्धांच्या घरात जन्माला येऊन बौद्ध होत नाही, तर बौद्ध धम्म दीक्षा स्वीकारल्याशिवाय तुम्ही बौद्ध होऊ शकत नाही असे स्पष्ट मत प्रमुख वक्ते डॉ.निरज बोधी यांनी केले. विशेष अतिथी अहमदाबादचे रमेश बँकर म्हणाले - अहमदाबाद मध्ये आम्ही आमच्या संस्थे मार्फत बौद्ध धम्म संस्कृतीचा प्रचार प्रसार तर करतोच पण बौद्ध संस्कृती पाळण्याचा पूर्णतः प्रयत्न करीत असतो. बौद्ध धम्माच्या तत्त्वावरच भारतीय संविधान उभे आहे असे मत उदाहरणादाखल डॉ. सरोज आगलावे यांनी व्यक्त केले. आपली बौद्ध संस्कृतीची छाप कायम ठेवावी असे सांगताना धम्मप्रचारक पुष्पाताई बौद्ध यांनी सभागृहाला अचंबित करणारे असे नागपूर शहराबाहेरचे शुभ्र वस्त्र संदर्भातील उदाहरण सांगितले. भारतीय संविधानाचे गाढे अभ्यासक प्रा. जावेद पाशा यांना नुकताच पुणे येथे महाराष्ट्र फाउंडेशन तर्फे 50 हजार रोख रक्कम आणि सन्मान चिन्ह शाल देऊन प्राप्त झालेला अलीकडचा ‘सामाजिक संघर्ष पुरस्कार’ लक्षात घेता त्यांचाही सत्कार करण्यात आला. संविधानाची होत असणारी पायमल्ली थांबविण्यासाठी कूठला पवित्रा घ्यावा या संदर्भात जावेद पाशा यांनी केलेले मार्गदर्शन सभागृहाला उत्तेजित करून गेले. बानाईचे माजी अध्यक्ष राहुल परुळेकर आणि इंजिनिअर सुषमा भड यांनी संविधान जागर टीमच्या कार्याचे भरभरून कौतुक केले. हे कार्यक्रमाची ऊर्जा कायम ठेवणारे होते. डॉ. जांभूळे सरांचे वक्तव्य देखील प्रेरणादायी होते. अध्यक्षीय भाषणात डॉ. सिद्धार्थ गायकवाड यांनी उपस्थित मान्यवरांच्या भाषणाचा परामर्श घेत म्हणाले. संविधान लिहिताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जी दूरदृष्टी होती त्यात आपण खरे उतरलो का असा प्रश्नचिन्ह उपस्थित केला. प्रेक्षकांनी भरगच्च भरलेल्या सभागृहात मान्यवरांचे विचार प्रेक्षक शांततेने ऐकत होते ही कार्यक्रमाची फलश्रुती आहे. रमेश बँकर यांचा अगदी नेटका परिचय देणारे मेघराज वानखेडे आणि परिचयाचा कूठलाही कागद ज्यांच्याजवळ नव्हता तरी सुपरिचीत असणारे डॉ.नीरज बोधी यांचा इंजिनियर राजेंद्र मडके यांनी वेळेवर दिलेला परिचय खरोखरीच स्पृहणीय होता. पुष्पाताई बौद्धच्या मैत्री संघ द्वारा मैत्रिणींनी गायलेले मैत्री गीत आणि डॉ. जांभूळे लिखित संविधान गीताने देखील मानवतेचे सौंदर्य निश्चितच वाढविले होते. अनिता वानखेडे, मनीषा पाटील आणि जया कालिहारी यांनी व्यक्तिशः सूत्रसंचालन सांभाळण्याचा चांगला प्रयत्न केला. निश्चितच गुजरातचे स्नेही एक चांगला विचार नागपुरातून घेऊन गेलेत. कोटगावच्या नऊ लोकांच्या टीमचा आनंदही टिपण्यासारखा होता. यासाठी डॉ. एम.एस. जांभूळे सरांनी केलेले परिश्रम आणि प्रेक्षकांना जमवण्याची कला ही खरोखरच वाखाणण्यासारखी होती. आणि मंगलाताई जांभुळे यांचा भक्कम आधार कार्यक्रमाच्या यशस्वीतेची पडद्यामागची गुरुकिल्ली आहे. वेळेवर प्रोग्राम सुरू झाल्याचा आनंद तर निराळाच होता. त्यातही मान्यवरगण वेळेवर आलेत ही कार्यक्रमाची उंची होती. विविध महिला संघटनांचे स्वागत डॉ. सिद्धार्थ गायकवाड बोधी सरांनी केल्याचा आनंद महिला संघटनेच्या चेहऱ्यावर झळकत होता. त्यातही मी सिद्धार्थ सरांना स्वतः सांगितले की सर तुम्हीच महिलांचा सन्मान करा आणि ते लगेच स्टेजखाली उतरले. हा त्यांच्या नम्रतेचा अलंकार माझ्या हृदयाला स्पर्शून गेला. सर्व प्रेक्षकांच्या पोटाची भूक भागविणारे अरुण मेश्राम यांचा केलेला सत्कार दान पारमीतेची पावती आहे. नेहमी आर्थिक सहकार्य करनारे हे दांपत्य अर्थात इंजि. राजेंद्र मडके, विजया मडके दांपत्य आणि मेघराज वानखेडे अनिता वानखेडे या द्वय दांपत्यांचा केलेला सत्कार जांभूळेंशी असलेल्या कौटुंबिक नात्यांची वीण गुंफत होता. डॉ. मनीष वानखेडे यांची उपस्थिती आणि प्रा.भीमराव गायकवाड यांनी सन्मान चिन्हासाठी दिलेला वेळ संविधान जागरची बांधिलकी जपत होती. सत्कारानंतर थोडं विस्कटलेल्या वातावरणात नंदा पंचभाईने केलेले आभार प्रदर्शनही टिपण्यासारखे होते. संविधान जागर टीमच्या आयोजका व्यतिरिक्त संविधान जागरमधील अन्य कलावंतांनी अर्थात संध्या वारके, सीमा थूल, वंदना धनविजय यांनी देखील मंचावरील कार्यभार वेळोवेळी सांभाळला. अभिमान महिला अर्बन बँकेचे सी ओ वीरेंद्र मेश्राम ने चहा बिस्कीट ची केलेली व्यवस्था ही सभागृहाचा मानसिक थकवा कमी करणारी होती. आयोजक संस्थेनी डॉ. एम. एस.जांभुळे, डॉ.वीणा राऊत, डॉ. मनीष वानखेडे प्रा. भीमराव गायकवाड, मंगला जांभूळे, जया कलीहारी, सुनंदा गायकवाड, नंदा पंचभाई, मनीषा पाटील, रंजना लोखंडे, वंदना धनविजय, संध्या वाळके, सीमा थूल, गुंफा पाटील असा डॉ. एम एस जांभूळे लिखित संविधान जागर 150 प्रयोगपूर्ती केलेल्या कलावंतांचा सत्कार हा आमचा नसून डॉ. बाबासाहेबांनी लिहीलेल्या भारतीय संविधानाचा आणि ज्यांनी आमचे प्रोग्राम आयोजित केले त्या सर्व समाजाचा हा सत्कार आहे. तरी आम्ही सर्व सत्कारप्राप्त स्नेही हा सत्कार समाजाला समर्पित करतो असे वक्तव्य दिग्दर्शक डॉ. वीणा राऊत यांनी केले. दैनिक बहुजन सौरभ च्या निवासी संपादक संध्या राजूरकर यांनी संविधान जागर लघु नाट्याची दैनिक बहुजन सौरभ वर्तमानपत्रात ऊर्जायुक्त लेखणीने घेतलेली दखल आम्हाला पुढील प्रवासासाठी निश्चितच प्रेरणादायी आहे. ■ ■



डॉ. वीणा राऊत नारनवरे
मो. 9422554678

# ‘एकल’ स्त्री-पुरुष - समाज, संविधान आणि वास्तव

## स्मिता - स्मृती




वडाच्या झाडाच्या लोंबणाऱ्या पारंब्यांखाली बांधलेला चबुतरा. त्या खाली ‘तो’ आणि ‘ती’ निवांत बसलेले. काही क्षण एकमेकांच्या सहवासात प्रेमात आनंदाने न्हाहून निघालेले. आनंद-दुःखाचा समतोल साधत कितीतरी दिवस ते इथे येत असत. पण अचानक ‘तो/ती’ एकमेकांपासून दूर होतात, कधी निसर्गाने हिसकावून घेतलेले, कधी स्वतःहून, तर कधी समाजाने. एकटेपणाची सल आयुष्यभर बोचत राहते, ‘एकल’ होऊन, माझ्या-तुमच्या अवतीभवती असे अनेक ‘एकल’ दिसतात. ग्रामीण भागापासून शहरी भागापर्यंत. कधी मीसुद्धा समाजाचा विक्षिप्त भाग म्हणून त्यांच्या ‘एकल’ अवस्थेची टिंगलटवाळी केली, तर कधी दयाभावानेही विविध चेहरे पाहिले. पण त्यातही ‘ती’ अधिक दिसली; ‘तो’ मात्र क्वचितच. ‘ती’ला अधिक टोचण्या, तर ‘तो’ कायम सक्षम. एक दिवस बहुजन सौरभच्या कार्यालयातून राजूरकर मॅडमचा फोन आला, ‘माझ्याकडे ‘स्मिता-स्मृती’ विशेषांक आहे, घेऊन जा.’ ‘स्मिता-स्मृती’ या पुरस्काराबद्दल मला माहिती होती, पण विशेषांक मी फारसे वाचले नव्हते. हा विशेषांक स्मिता पाटील यांच्या स्मृतीस अर्पण केलेला आहे, हेही मला माहीत होते. विशेषांक हातात पडताच वाचनातून वेगळाच विषय समोर आला. हा विषय मला फार महत्त्वाचा वाटला. आपण अनेक सुख-दुःखांबद्दल बोलतो; पण अवतीभोवती एकटे आयुष्य जगणारे असंख्य लोक आहेत. ‘एकल’ या माध्यमातून नकळत अनेकांची आठवण झाली. खळखड आयुष्यात कधी कोणाच्या वाट्याला भेगाळलेली जमीन आली, कधी कुणी त्या जमिनीला नांगरून बाग फुलवली, तर कधी कुणाच्या वाट्याला बाग फुलूनही दुष्काळ आला. त्या दुष्काळाला पचवण्याची ताकद कुणाकडे होती, तर कुणाकडे नव्हती. ‘एकल’ आयुष्यात एकट्या स्त्री-पुरुषांच्या वाट्याला दुःख, निराशा येतात; पण त्या निराशेतूनही एक अत्यंत आशावादी भाव दिसतो. हा सकारात्मक आशावाद प्रेरणा देतो. कधी कधी तो निराशेकडेही नेतो; पण मुखपृष्ठावरील ‘जळती मेणबत्ती’ पाहिली, तर ‘एकल’ आयुष्यातील सतत जळत राहून दुसऱ्याला प्रकाशित करणारा आशावाद प्रतीत होतो. मुखपृष्ठ उघडताच स्मिता पाटील यांची मोहक अदा चित्ररूपात दृष्टीस पडते. तमाम प्रेक्षकांची आवडती अदाकार, तिच्या अभिनयाने, प्रतिभेने आणि सामाजिक जाणीवेतून केलेल्या कार्यामुळे तिच्या प्रत्येक पैलूला जिवंत ठेवण्याचे कार्य हा अंक करतो. विविध विषयांतून अजरामर असणारी ही ‘स्मिता’ चाळीस वर्षांचा काळ लोटला तरीही ‘स्मिता-स्मृती’ या अंकातून घट्ट आवळून धरली जाते व जिवंत राहते. या विशेषांकाचे प्रबंध संपादक गिरीश गांधी यांनी या अदृश्य विषयाला हात घालून, कितीतरी खोल गर्तेत धूळ खात पडलेल्या ‘एकल’ आयुष्याकडे समाजाचे लक्ष वेधले आहे. एकविसाव्या शतकात संविधानाने विधवा, घटस्फोटीत, परित्यक्त व फसवलेल्या महिलांचे जीवन कायद्याने सुरक्षित केले असले, तरी सामाजिक नेणिवेतून पाहिले तर ‘एकल’ जीवन जगणाऱ्या स्त्री-पुरुषांच्या वेदना फार वेगळ्या आहेत.

अतिथी संपादक नीलम शिर्के यांनी ‘एकल’ पुरुष व स्त्री यांच्या सामाजिक समस्या वेगळ्या असल्याचे अधोरेखित केले आहे. पुरुष सामाजिक व व्यावसायिकदृष्ट्या अधिक स्थैर्य प्राप्त करतो; मात्र एकटी स्त्री सामाजिक, आर्थिक व कौटुंबिक समस्यांशी झुंज देताना अधिक कसोटीला लागते, हे महत्त्वाचे विधान आहे. या विशेषांकात नामवंत पुरुषांचे ‘एकल’ चिंतन प्रसिद्ध झाले आहे. मात्र ‘एकल’ महिला हा विषय कायमच अंतःकरणाला भिडणारा आहे, कारण सामाजिक परिस्थितीच तशी आहे. संपादकीयात हेरंब कुलकर्णी यांनी मांडलेली वास्तविकता महत्त्वाची आहे. विधवा, परित्यक्त, घटस्फोटीत, कुमारीका, सौभाग्यवती हे शब्द स्त्रीला पुरुषांमुळे मिळतात; आणि ती ‘एकल’ झाली की याच पुरुषी प्रतीकांमुळे ती सामाजिक त्रासाला बळी पडते. मोहन आगाशे यांच्या ‘वेळ झालाच नाही’ या लेखातून त्यांच्या आयुष्यात डोकावताना दिसते की, कलेच्या नादात व कामाच्या व्यापात स्वतःला सिद्ध करताना त्यांना ‘एकल’पणाची जाणीव झाली नाही. वार्धक्यातही ते आयुष्याविषयी फारशी तक्रार करत नाहीत. आंतरराष्ट्रीय ख्यातीचे पत्रकार जतिन देसाई कुटुंबाच्या सोबतीमुळे ‘एकल’ आयुष्यातही एकटेपणाची उणीव जाणवत नाही असे सांगतात. कवी ग्रेस यांचे ‘तो गेला तेव्हा’ या लेखातून कवीच्या भावविश्वाचा आणि वास्तव आयुष्याचा विरोधाभास स्पष्ट होतो. वैचारिकदृष्ट्या ‘एकल’पणाची जाणीव कधी नजाणिवेसारखीही असते; पण हाताला काम असेल तर मेंदू रिकामा राहत नाही, हेही येथे लागू पडते. तरीही सर्वसामान्य पुरुषांच्या ‘एकल’ आयुष्याचे दर्शन या विशेषांकात कमी आढळते, याची थोडी खंत वाटते. कदाचित त्यांची परिस्थिती फार वेगळी असेल. ‘एकल’ महिला जीवनाचे दर्शन आजच्या समाजाला अधिक आवश्यक आहे. स्त्री कितीही शिकलेली, मोठ्या पदावर असली तरी तिचे ‘एकल’ आयुष्य समाज अजूनही स्वीकारत नाही. मात्र मंजुषा जोशी, ॲड. सुलेखा कुंभारे, सारिका कौशिक, कुंदा राऊत, अतुला पटवर्धन, अनिता विजयकर, डॉ. मनीषा अलबाड, केतकी अरबट, पूजा मनमोडे, ज्वाला धोटे अशा महिलांनी वेगवेगळ्या कारणांमुळे आलेल्या एकटेपणातून स्वतःचे मार्ग शोधले. त्यांचे अनुभव इतर स्त्रियांसाठी प्रेरणादायी आहेत. ‘एकल’ आयुष्यामुळे या स्त्रिया अधिक प्रगती करू शकल्या, ही बाबही महत्त्वाची आहे. प्राचार्य संध्या राजूरकर यांच्यासारखे व्यक्तिमत्त्व एकटे राहूनही बहुजन सौरभच्या संपादिका म्हणून व सामाजिक कार्यातून समाजाशी जोडलेले आहे. समाजच त्यांचे कुटुंब झाले असून ‘एकल’पण त्यांच्या आयुष्यात सुखद ठरले आहे. ‘एकल’ आयुष्य ही आजचीच बाब नाही. पूर्वी तर हे आयुष्य अधिक कष्टदायक होते. संत साहित्यामधून त्याचे गाऱ्हाणे दिसते, असे अंजली कुलकर्णी सांगतात. संत जनाबाई अविवाहित होत्या. समाजाला त्यांनी अभंगातून सडेतोड उत्तर दिले -

*‘डोईचा पदर आला खांद्यावरी*
*भरल्या बाजारी जाईन मी’*

कथा, कादंबऱ्यांतूनही अनेक लेखकांनी ‘एकल’ जीवनाचे वास्तव मांडले आहे. विनया खडपेकर यांनी स्त्री ‘एकल’पणावर महत्त्वाच्या गोष्टी अधोरेखित केल्या आहेत, कुमारी असली की टिंगल, घटस्फोटीत स्त्रीला दोष, धार्मिक विधीतून वगळले जात नसले तरी डावलले जाते, विधवा अशुभ समजली जाते. हे कटू वास्तव आहे. विलास वकील यांचे ‘एकल’ महिलांसाठीचे कार्य अत्यंत महत्त्वाचे आहे. अनेकदा स्त्रीचे उद्धारकर्ते पुरुष ठरतात, हेही येथे स्पष्ट होते. ‘एकल’ होण्यामागे अनेक कारणे असतात, जोडीदार मिळेल का, स्वातंत्र्यावर गदा येईल का, समायोजनाचा मानसिक ताण का कायम स्त्रीनेच सहन करायचा? या प्रश्नांमुळेही अनेक स्त्रिया ‘एकल’ पर्याय निवडतात. हिंदू धर्मातील अनेक रूढी स्त्रीला दासी मानणाऱ्या आहेत. स्त्रीनेच सत्यवानाचे प्राण परत आणायचे; पण स्त्री गेली तर पुरुषाने दुसरे लग्न करायचे ! मनुस्मृती तर स्त्रीला अधिकच हिणवते. म्हणूनच घटस्फोटीत, विधवा, परित्यक्त स्त्रियांना अपशकुनी ठरवले जाते. मुस्लिम समाजातील ‘एकल’ स्त्रियांचे जीवन तुलनेने समाधानकारक असल्याचे हिना कौसर खान यांनी मांडले आहे; तरीही त्यातही अनेक प्रश्न आहेत, हा स्वतंत्र विषय होऊ शकतो. भटक्या-विमुक्त, वंचित घटकांतील स्त्रियांचे ‘एकल’ आयुष्य अत्यंत खडतर आहे. अंधश्रद्धा, अशिक्षण, देवदासी, मुरळी प्रथा यामुळे परिस्थिती अधिक भयानक होते. एकटी बाई ही कायम चर्चेचा विषय ठरते. ती कशी राहते, कुणासोबत जाते, या प्रश्नांतून तिला मानसिक त्रास सहन करावा लागतो. आज मानसशास्त्र, सोशल मीडिया यांमुळे वैयक्तिक स्वातंत्र्याची जाणीव वाढली असताना, ‘एकल’ महिलांना समाज मानसिक त्रास का देतो, याचा विचार करण्याची गरज आहे. प्रत्येकाचे आयुष्य हे त्याचे वैयक्तिक असते. दुसऱ्याच्या आयुष्यात डोकावण्याची वृत्ती ही आपली वैचारिक क्षमता दर्शवते, असे मला वाटते. डॉ. बाबासाहेबांनी दिलेल्या हिंदू कोड बिलामुळे ‘एकल’ स्त्रियांची कायदेशीर स्थिती सुधारली; पण मानसिकतेत अजूनही बदल झालेला नाही. जागतिक पातळीवरही विधवांची संख्या वाढते आहे. अपघात, आजार, गरिबी, व्यसन, बालविवाह अशा अनेक कारणांमुळे स्त्रियांवर ‘एकल’ आयुष्य येते. या विशेषांकात मिलिंद कुमार साळवे यांनी सरकारच्या विविध योजनांची माहिती दिली असून, त्या महिलांसाठी मदतीचा हात ठरतो. ‘स्मिता-स्मृती’च्या 39व्या विशेषांकाने ‘एकल’ या अदृश्य प्रश्नाला हात घालून समाजाला, व्यक्तींना विचार करायला भाग पाडले आहे. परिवर्तनाची गरज अधोरेखित केली आहे. नक्कीच 2025 चा ‘स्मिता-स्मृती’ विशेषांक वाचकांच्या मनाला भिडणारा व विचारप्रवर्तक ठरतो. ■ ■



प्रीती तिरपुडे
7972119871

“ कष्टाचा आवाज शब्दाच्या आवाजापेक्षा मोठा असतो... ”



# हजारो पुस्तकांवरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे छायाचित्र

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना प्रत्यक्ष पाहण्याचा योग आला नसला, तरी त्यांच्या पुस्तकांमधून, ग्रंथांमधून आणि वृत्तपत्रांमधून त्यांच्या विचारांचे दर्शन झाले. आंबेडकरी विचारांच्या प्रभावामुळे वैचारिक घडण घडत गेली. नियमित वाचनालयात जाऊन तसेच पुस्तके खरेदी करून त्यांचे सातत्याने वाचन व संदर्भ घेतले गेले. अनेक पुस्तकांच्या मुखपृष्ठावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे छायाचित्र पाहून वाचनाची अधिक उत्सुकता निर्माण झाली. मित्रांनी आपल्या निवासस्थानी विचारांचे समृद्ध असे ग्रंथालय उभारले असून अशी हजारो आंबेडकरी ग्रंथघरे देशभरात अस्तित्वात आहेत.**

दैनिक बहुजन सौरभचा प्रचार व प्रसार करत असताना नागपूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मेट्रो रेल्वे स्टेशन चौकात एका मित्राची भेट झाली. त्याच्या आग्रहामुळे त्याच्या घरी भेट दिली असता, केवळ आंबेडकरी ग्रंथांनी भरलेले भव्य ग्रंथघर पाहून मन थक्क झाले. ही सर्व पुस्तके मित्राने स्वतःच्या कष्टाच्या पैशातून खरेदी केली होती. हजारो पुस्तकांच्या मुखपृष्ठांवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे छायाचित्र असून ती ग्रंथसंपदा आंबेडकरी विचारांच्या प्रचाराची साक्ष देणारी आहे.

**मुखपृष्ठ एक स्वतंत्र कला आणि विचारांचे प्रतीक :-** मुखपृष्ठ रचना ही केवळ सजावटीची बाब नसून ती एक स्वतंत्र कला आहे. ग्राफिक डिझायनर, चित्रकार आणि लेखक यांच्यातील सर्जनशील संवादातून प्रभावी मुखपृष्ठ आकाराला येते. मुखपृष्ठ केवळ माहिती देत नाही, तर वाचकाच्या सौंदर्यदृष्टीला तृप्त करते. अनेकदा मुखपृष्ठ हेच पुस्तकाची ओळख बनते. काही पुस्तके त्यांच्या आशयाइतकीच त्यांच्या मुखपृष्ठांमुळे दीर्घकाळ लक्षात राहतात. मराठी साहित्याला समृद्ध आणि वैचारिक मुखपृष्ठांची परंपरा लाभली आहे. कादंबऱ्या, कवितासंग्रह, वैचारिक व सामाजिक साहित्य यांची मुखपृष्ठे आशयसंपन्न आणि अर्थपूर्ण असतात. सामाजिक, परिवर्तनवादी आणि आंबेडकरी साहित्यामध्ये मुखपृष्ठ हे विचारांचे प्रतीक म्हणून वापरले जाते. छत्रपती शिवाजी महाराज, संत, समाजसुधारक यांची पुस्तके त्यांच्या प्रभावी मुखपृष्ठांमुळे अधिक परिणामकारक ठरली आहेत. बालसाहित्यामध्ये मुखपृष्ठाचे महत्त्व विशेष असून रंगीत चित्रे, आकर्षक पात्रे आणि सोपी अक्षरशैली यामुळे मुलांचे लक्ष वेधले जाते. मुलांना पुस्तक वाचण्याची गोडी लागण्यात मुखपृष्ठाची मोठी भूमिका असते. त्यामुळे बालसाहित्याच्या मुखपृष्ठांवर विशेष मेहनत घेतली जाते. आजच्या डिजिटल युगात ई-बुक्स, ऑनलाइन विक्री आणि सोशल मीडियामुळे मुखपृष्ठाचे महत्त्व अधिक वाढले आहे. मोबाईल किंवा संगणकाच्या छोट्या स्क्रीनवरही उठून दिसेल असे मुखपृष्ठ असणे आवश्यक झाले आहे. आधुनिक फॉन्ट, डिजिटल डिझाइन आणि मिनिमल रचना यांचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. पुस्तक विक्रीमध्ये मुखपृष्ठाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. पुस्तक प्रदर्शन, दुकाने आणि ऑनलाइन प्लॅटफॉर्म सर्वत्र मुखपृष्ठच वाचकाशी पहिला संवाद साधते. मात्र मुखपृष्ठ जितके आकर्षक तितकेच प्रामाणिक असणे आवश्यक आहे. दिशाभूल करणारे किंवा आशयाशी विसंगत मुखपृष्ठ वाचकाचा विश्वास घालवू शकते. त्यामुळे मुखपृष्ठ हे सौंदर्य आणि सत्य यांचा समतोल साधणारे असावे. सूर्य प्रकाशाइतके किरणे हजारो मुखपृष्ठांवरील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या छायाचित्रातून दिसत असतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ एक व्यक्तिमत्त्व नसून ते एक विचारप्रवाह, एक सामाजिक क्रांती आणि अखंड चालू असलेली चळवळ आहेत. त्यांनी दिलेले विचार, केलेला संघर्ष आणि उभारलेली मूल्यव्यवस्था आजही समाजाला दिशा देत आहे.



विलास गजभिये
मो. 9421588901



म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे छायाचित्र हजारो पुस्तकांच्या मुखपृष्ठांवर दिसतात. हे छायाचित्र केवळ सौंदर्यासाठी नसून ते विचारांचे प्रतीक, संघर्षाची साक्ष आणि परिवर्तनाची प्रेरणा आहे. पुस्तकाच्या मुखपृष्ठावर डॉ. बाबासाहेबांचा फोटो असणे म्हणजे त्या पुस्तकाची विचारधारा, सामाजिक भूमिका आणि परिवर्तनवादी दिशा स्पष्टपणे मांडणे होय. फोटो म्हणजे विचारांची दृश्य अभिव्यक्ती डॉ. बाबासाहेबांचा फोटो पाहताच त्यांच्या विद्वत्तेची, आत्मविश्वासाची आणि संघर्षशीलतेची जाणीव होते. डोळ्यांतील दृढ निश्चय, चेहऱ्यावरील गांभीर्य, नीटनेटका पोशाख आणि हातात पुस्तक किंवा भारतीय संविधान, ही प्रतिमा त्यांच्या विचारशील आणि क्रांतिकारी व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडवते. त्यामुळे डॉ. बाबासाहेबांचा फोटो हा केवळ प्रतिमा नसून विचारांची दृश्य अभिव्यक्ती आहे. मुखपृष्ठावर डॉ. बाबासाहेबांचा फोटो का असतो?

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो पुस्तकांच्या मुखपृष्ठावर असण्यामागे ठोस कारणे आहेत. सामाजिक न्याय, समता आणि मानवमूल्यांचे प्रतीक, दलित, वंचित व शोषित वर्गाच्या संघर्षाचे प्रतिनिधित्व, संविधान, कायदा आणि लोकशाही मूल्यांची ओळख, परिवर्तनवादी, आंबेडकरी विचारधारेची स्पष्ट दिशा, वाचकाच्या मनात आत्मविश्वास आणि प्रेरणा निर्माण करतात.

डॉ. बाबासाहेबांचा फोटो असलेले पुस्तक पाहताच वाचकाला त्या पुस्तकाचा आशय, भूमिका आणि उद्देश सहज समजतो.

**आंबेडकरी साहित्य आणि मुखपृष्ठ संस्कृती :-** आंबेडकरी साहित्यात मुखपृष्ठाला विशेष महत्त्व आहे. येथे डॉ. बाबासाहेबांचा फोटो हा सजावट नसून विचारांची घोषणा असते. आत्मचरित्रे, वैचारिक लेखसंग्रह, चळवळीवरील पुस्तके, कवितासंग्रह आणि सामाजिक अभ्यासग्रंथ या सर्व प्रकारच्या पुस्तकांच्या मुखपृष्ठांवर डॉ. बाबासाहेबांचा फोटो आढळतो. तो वाचकाला सांगतो की हे पुस्तक अन्यायाविरुद्ध बोलणारे, समतेचा पुरस्कार करणारे आणि माणुसकीची बाजू घेणारे आहे.

**विविध रूपे, एकच विचार :-** मुखपृष्ठांवर डॉ. बाबासाहेबांचे विविध प्रकारचे फोटो वापरले जातात. विद्वान बाबासाहेब (सूट-बूट, चष्मा), संविधान शिल्पकार (हातात भारतीय संविधान), चळवळीचे नेते (भाषण करतानाचे फोटो), मानवतावादी विचारवंत (शांत, चिंतनशील मुद्रा), रूप वेगवेगळे असले तरी प्रत्येक फोटो शिक्षण, संघटन आणि संघर्ष या एकाच विचाराची आठवण करून देतो.

**वाचक आणि मुखपृष्ठ यांचे नाते :-** पुस्तकाचे मुखपृष्ठ हे वाचक आणि पुस्तक यांच्यातील पहिला संवाद असतो. डॉ. बाबासाहेबांचा फोटो असलेले मुखपृष्ठ पाहताच वाचक भावनिक आणि वैचारिकदृष्ट्या त्या पुस्तकाकडे आकर्षित होतो. आंबेडकरी चळवळीशी जोडलेले वाचक या फोटोमध्ये आपली ओळख, इतिहास आणि संघर्ष पाहतात. त्यामुळे असे पुस्तक हातात घेताना त्यांना अभिमान, आत्मसन्मान आणि प्रेरणा मिळते.

**लोकशिक्षणाचे प्रभावी माध्यम :-** भारतासारख्या देशात, जिथे दृश्य माध्यमांचा प्रभाव अधिक आहे, तिथे डॉ. बाबासाहेबांचा फोटो असलेले मुखपृष्ठ हे लोकशिक्षणाचे प्रभावी साधन ठरते. आज डिजिटल युगात ई-बुक्स, सोशल मीडिया पोस्ट्स आणि ऑनलाइन प्रकाशनांमधून डॉ. बाबासाहेबांचे विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचत आहेत. निळा रंग, संविधान, अशोकचक्र यांसारखी प्रतिके विचारांची ओळख बनली आहेत.

**मुखपृष्ठावरील फोटोची जबाबदारी :-** डॉ. बाबासाहेबांचा फोटो वापरणे ही मोठी जबाबदारी आहे. तो फोटो आदरयुक्त, सुसंगत आणि विचारधारेशी प्रामाणिक असला पाहिजे. केवळ विक्रीसाठी किंवा आकर्षणासाठी फोटोचा गैरवापर होऊ नये. मुखपृष्ठ आणि आशय यांच्यात सुसंगती नसेल तर वाचकाचा विश्वास डळमळीत होऊ शकतो. पुस्तकाचे मुखपृष्ठ म्हणजे त्या पुस्तकाची ओळख, व्यक्तिमत्त्व आणि विचारधारा होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे छायाचित्र असलेले मुखपृष्ठ हे सामाजिक आत्मसन्मान, परिवर्तन आणि लोकशिक्षणाचे प्रभावी माध्यम आहे. भविष्यात ग्राफिक आर्ट, डिजिटल इलस्ट्रेशन आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने डॉ. बाबासाहेबांचा विचार अधिक प्रभावीपणे नव्या पिढीपर्यंत पोहोचेल. ■ ■

# परिवर्तन साहित्य संमेलनाची यशस्वीता

द्वितीय परिवर्तन साहित्य संमेलनाची सुरुवात 30 जानेवारी 2026 रोजी परिवर्तन मार्च आणि ग्रंथ दिंडी काढून झाली. दिंडी मधील क्रांतीबा ज्योतीबा फुले, सावित्रीबाई फुले आणि छत्रपती शाहू महाराजांच्या वेशभूषेत असलेले कार्यकर्ते लक्ष वेधून घेत होते. टेलीफोन नगर चौक ते रतनसुत्त बुद्ध विहारपर्यंत महामानवांच्या जयजयकाराची दिंडी अविस्मरणीय ठरली. सभागृहात प्रवेश करण्यापूर्वी दुर्गुणांचा दहनक्रिया कार्यक्रम संपन्न झाला. त्यात क्रोध, लोभ, माया, मत्सर, क्रौर्य, कुरघोडी, असूया, कूटनिती, धूर्त, घरभेदी बीभत्स, घमंड, आत्मकेंद्री, चिडकी वृत्ती, जातिभेद, धर्मांधता, अंधश्रद्धा, गुलामी, विकृती, व्यसनाधीनता, खोटेपणा, जातीव्यवस्था, तामसी वृत्ती या प्रवृती वेगवेगळ्या कागदावर लिहून त्याचे दहन करण्यात आले. त्यानंतर आयोजित काव्यगायन कार्यक्रमांतर्गत सम्यक म्युझिकल ग्रूप द्वारे प्रस्तुत बुद्ध-भीम गीते, रमाई ग्रूप, टेक ऑफ सिटी द्वारे ‘ठोका केलावं माय’ हा नाट्यप्रयोग उद्बोधक ठरला. शोभा पाटील यांच्या ‘मी सावित्रीबाई फुले बोलतेय’ या एकपात्री नाटकाला उत्फुर्त प्रतिसाद लाभला.

31 जानेवारी 2026 रोजी संपन्न झालेल्या उद्घाटन सत्रात डॉ. दीपक बनसोड यांच्या संचाद्वारे मुकनायक गीत, परिवर्तन गीत सादर झाले. आंबेडकरी समाजातील विवाह प्रथेतील प्रदूषणावर डॉ. विद्या मानकर यांचे उद्घाटकीय भाषण लोकांचे कानउघाडणी करणारे ठरले. आंबेडकरी समाजाला साहित्य संमेलनाची आजही नितांत गरज असल्याचे भदंत नागदिपांकर आणि डॉ. महेंद्र पाटील यांनी विचार व्यक्त केले. परिवर्तन विचार मंचचे अध्यक्ष विलास गजभिये यांनी साहित्य संमेलनाच्या ध्येय धोरणाची मीमांसा केली. त्यांनी सर्व कार्यकर्त्यांच्या सक्रिय योगदानाचे कौतुक, अभिनंदन केले. यावेळी भागधारक यू. पी. कांबळे यांनी स्वतःच्या मुलाला बहुजन सौरभचे भागधारक बनविल्यामुळे त्यांचा सत्कार करण्यात आला. माया नामदेवराव कांबळे यांच्या आजीवन केलेल्या सामाजिक कार्याबद्दल त्यांना ‘परिवर्तन विचार जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. श्रीराम बनसोड, विनोद आटे, शत्रुघ्न लोणारे, प्रभू फुलझेले, माधुरी लोखंडे, डी. आर. कांबळे, विशाखा नकासे, संगीता चव्हाण, डॉ. माधव जांभुळे या मान्यवरांना विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. वरील सर्व मान्यवराचे स्वागत ज्योत्स्ना बनसोड यांनी केले.

सुप्रसिद्ध लेखक, आंबेडकरी विचारवंत आणि माजी न्यायाधीश अनिल वैद्य हे दुसऱ्या परिवर्तन साहित्य संमेलनाचे अध्यक्ष तसेच प्रमुख आकर्षण होते. त्यांनी आपल्या वक्तव्यात आंबेडकरी समाजातील व्याप्त व्यथा आणि भविष्यात येणाऱ्या संकटावर सखोल विचार व्यक्त केले. आंबेडकरी समाजाचा वैचारिक उत्सव कसा असावा, याचा परिपाठ म्हणजे हे साहित्य संमेलन होय. डॉ. बाबासाहेबांची वृत्तपत्रे ही विचारांची मशाल होती. नव्वदीच्या काळात लोकमत, जनवाद सारख्या वृत्तपत्रातून समाजात ‘कायदा’ हे सदर साक्षरता निर्माण करण्यासाठी चालवण्याचा उल्लेख करून त्यांचे ‘कायदा’ हे पुस्तक वाचल्यावर व्यक्ती अर्धा वकिल बनतो अशी त्या पुस्तकाची किमया असल्याचे त्यांनी सांगितली. न्यायाधीशांचे लेखन





प्रसिद्धीसाठी कधी झाले नाही तर ते समाजाच्या गरजेतून, अनुभवातून आणि सामाजिक उत्तरदायीत्वातून जन्माला आल्याचे जाणवले. दुसऱ्यांचे साहित्य, लेख, कविता किंवा विचारांना प्रोत्साहित करुन मैत्रीभाव वाढवण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. बुद्ध-आंबेडकरी साहित्य हे मैत्री, करुणा, विवेक आणि समतेची परंपरा सांगतात. पण आज त्याच परंपरेचे धिंडवडे निघत असून निंदा, मत्सर, हेवा आणि द्वेष वाढला असल्याची खंत व्यक्त करतात. आज अनेक घटना संवैधानिक मूल्यांवर आघात करणाऱ्या घडत आहेत. त्यामुळे आंबेडकरी लेखन हे मौन धारण करणारे नसावे, समर्पण ऐवजी संघर्ष करणारे, वैचारिक धैर्य देणारे असावे, तसेच आधुनिक लेखन हे संशोधनाधारित वस्तुनिष्ठ मांडणी करणारे असावे, असे न्यायाधीश वैद्य यांनी सुचवले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संपूर्ण विचार, लेखन देशापुढे आले पाहिजे. ते केवळ अस्पृश्यांचे नेते, घटनाकार नसून ते एक महान राष्ट्रपुरुष होते हे जगाला उलगडून दाखवले पाहिजे. कारण डॉ. बाबासाहेबांची ज्ञानपरंपरा ही इतिहासातील सत्य सांगणारी, विकृत प्रतिमा दुरुस्त करणारी आहे. ही ज्ञानपरंपरा पुढील पिढीकडे सोपवणारी असावी. भगवान बुद्ध, सम्राट अशोक, राजा हर्षवर्धन, संत कबीर, महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा, ज्ञानाचा आणि मानवमुक्तीच्या प्रयत्नाचा प्रवास समाजापर्यंत पोहचवण्याची जबाबदारी लेखकांनी घेतली पाहिजे. नव्या पिढीसाठी सोप्या भाषेत, संशोधनात्मक लेखन झाले पाहिजे. कारण लेखक हा समाजाचा वैचारिक मार्गदर्शक असतो. त्यामुळे इतिहासातील सत्य बाहेर काढणे, विकृत प्रतिमा दुरुस्त करणे हेच लेखकांचे खरे कार्य असावे. आरक्षण म्हणजे समानता प्रस्थापित करण्याचे साधन होय. आरक्षण म्हणजे जात टिकवणे हा गैरसमज ठामपणे खोडून टाकला पाहिजे. समता प्रस्थापित होईपर्यंत बहुजनांना त्यांच्या खऱ्या इतिहासाची जाणीव करून देणे, त्यांच्या मनातील हीनतेचे संस्कार काढून समतेचे वैज्ञानिक, तर्कशुद्ध अधिष्ठान समाजासमोर ठेवणे हे प्रत्येक लेखकाचे नैतिक कर्तव्य आहे, Gen पिढी संघर्षापासून दूर आहे, ते प्रश्न विचारत नाहीत. या पिढीसाठी लेखकांनी बौद्धिक प्रशिक्षण देणारे, चिकित्सक विचार घडवणारे लेखन केले पाहिजे. या पिढीचे भविष्य घडवण्यासाठी विचारधन उभे केले पाहिजे, हेच आजच्या आंबेडकरी व बौद्ध साहित्याचे खरे प्रयोजन आहे, असे अनिल वैद्य यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून विचार व्यक्त केले. अध्यक्षांनी बहुजन सौरभच्या कार्याची दखल घेत मुख्य संपादक सिद्धार्थ कांबळे, निवासी संपादक संध्या राजुरकर आणि कार्यकारी संपादक विलास गजभिये यांच्या मैत्रीपूर्ण स्वभावाचा, कौशल्याचा आणि समाजाला संघटीत करण्याच्या कार्याचा गौरव केला. त्यांच्या उज्वल भविष्यासाठी मंगल कामना केली. साहित्य संमेलनाच्या आयोजनाला यशस्वी करणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांचा त्यांनी भाषणात उल्लेख करुन त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा व्यक्त केल्या.

संमेलनाच्या दुसऱ्या सत्रात सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या देवीदास अनुसायबाई दशरथ बांबोडे यांची ब. सौरभच्या संपादिका संध्या राजुरकर यांनी प्रकट मुलाखत घेतली. ‘आंबेडकरी समुहापुढे उभे असलेले आव्हान आणि उपाय’ या परिसंवादात श्रीराम बनसोड, प्रा. सुनीता इंगळे (अकोला), सुनंदा रायपुरे यांनी आपापले विचार व्यक्त केलेत. आंबेडकरी समाज वैचारिकतेने एकसंघ आहे, तो योग्य नेतृत्वाची वाट पाहत आहे असे श्रीराम बनसोड यांनी विचार व्यक्त केले. वरील तिन्ही वक्त्यांच्या भाषणांचा आढावा घेऊन या परिसंवादाचे अध्यक्ष प्रा. घनशाम धाबर्डे यांनी आजची आणि भविष्यातील आव्हानांची माहिती दिली, त्यावरील उपायाची चर्चा केली. या परिसंवादाचे संचालन प्रा. सुनंदा जुलमे, आभार प्रा. डॉ. दीपक बनसोड यांनी व्यक्त केले. ‘जिजाऊ’ या नाट्यकलेच्या लेखिका, दिग्दर्शक डॉ. विना राउत यांनी सादरीकरण केले. सहकलाकार मोनाली पोफरे यांनी सहभाग नोंदवला. लोकशाहीर राजेश शिर्के (मुंबई) यांनी रमाई आणि भीमाईचे जन्मगाव जागतिक पर्यटनावर यावेत यासाठी मागील 27 वर्षापासून प्रयत्न केल्याची माहिती दिली. येत्या 2027 साली महाड सत्याग्रहाची शताब्दी साजरी करण्याचे शिर्के यांनी आश्वासन दिले. या निमित्ताने सहावे परिवर्तन विचार मेळावा कोकण भागात आयोजित करण्याची त्यांनी घोषणा केली. या सत्रात जोत्स्ना बनसोड, प्रीती तिरपुडे, डॉ. संध्या भगत (वर्धा), प्रा. संध्या वैद्य (मुंबई) प्रा. सुनीता इंगळे (अकोला) यांचा ‘माहेरची साडी’ देऊन स्वागत सत्कार करण्यात आला. परिवर्तन विचार मंचच्या प्रथम साहित्य संमेलनाचे आयोजक मनोहर मेश्राम यांचा विशेष सत्कार करण्यात आला. संमेलनाध्यक्ष अनिल वैद्य यांनी भविष्यात होणाऱ्या जनगणना संबंधित समारोपिय भाषणात विशेष माहिती दिली. जनगणना करताना जातीच्या रकाण्यात काय लिहावे असा अनेक शिक्षितांना सुद्धा संभ्रम आहे. अध्ययन केल्यास धर्माच्या रकाण्यात बौद्ध आणि जातीच्या रकाण्यात ‘महार’ उल्लेख करण्याशिवाय गत्यंतर नसल्याचे न्यायाधीश वैद्य यांनी आंबेडकरी जनतेला सांगितले. कार्यक्रमाचे संचालन डॉ. विना राऊत आणि दोन दिवसीय कार्यक्रमाचे आभार रतनसुत्त विहाराचे सचिव सत्यजीत बोरकर यांनी केले. परिवर्तन साहित्य संमेलनाची दखल नागपुरातील सर्व वृत्तपत्रे आणि नागरिकांनी घेतली, ही या कार्यक्रमाची उपलब्धी होय. ■ ■



श्रीराम बनसोड,
8208617748

# सुरेश खोब्रागडे यांचे महानाट्य – ‘मूकनायक’ एक नाविन्यपूर्ण निर्मिती

आंबेडकरी साहित्यविश्वात लाखनी जि. भंडारा येथील साहित्यिक डॉ. सुरेश खोब्रागडे यांचे अनन्यसाधारण असे स्थान आहे. कविता, नाटक, समीक्षा आणि वैचारिक लेखनाची त्यांची आजवर 11 पुस्तके प्रकाशित असून त्यांच्या साहित्यावर तीन विद्यापीठात पीएच. डी. चे संशोधनकार्य सुरू आहे.

‘मी आंबेडकर बोलतोय’ हे त्यांचे एकपात्री नाटक देशभर गाजले असून त्याचे मागील 25 वर्षापासून 2000 प्रयोगांचे देशातील सात राज्यात सादरीकरण झाले आहेत. तर ‘मी माझ्या देशाच्या शोधात’ या एकपात्रीचे दोन राज्यात 107 प्रयोग झाले आहेत. याशिवाय तीन अंकी नाटक ‘चोरबाजार’ चा एक प्रयोग आणि ‘महासूर्याची सावली’ या एकपात्री नाटकाचंही त्यांनी लिखाण केले असून त्रैमासिक ‘मुक्तमंथन’ च्या अंकात ते प्रकाशित झाले आहे. 32 वर्षांपूर्वी, दि. 6 डिसेंबर 1993 रोजी त्यांनी ‘न्याय-अन्याय’ या एकांकिकेचा प्रयोग स्वतःच्या गावी रंगभूमीवरून सादर केला होता तेव्हापासून ते रंगभूमीशी लेखक आणि कलावंत म्हणून जुळले गेले.

आपल्या हातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनाचा परामर्ष घेणारे एखादे महानाट्य आकाराला यावे असे त्यांना नेहमी वाटत असे, त्यातूनच कोरोना काळात त्यांनी ‘मूकनायक’ या महानाट्याचे लेखन केले. कोरोना काळात सुट्टीचा पुरेपूर फायदा घेत, सारे जग थांबलेले असताना डॉ. सुरेश खोब्रागडे यांनी संपूर्ण महानाट्याचे रेकॉर्डिंग केले. गीत, संगीत, संवाद, नृत्य आणि एकूणच संपूर्ण महानाट्याला आकाराला आणले. रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळ महाराष्ट्र शासनाचे या महानाट्याला स्थायी प्रमाणपत्र मिळाले असून त्याचा क्रमांक डी आरएम- 94 /2022 दि. 9/ 2/ 2022 असा आहे. मुक्ताई बहुउद्देशीय शिक्षण संस्था दिघोरी निर्मित वंचित, बहुजनांचा महानायक] ‘मूकनायक’ या महानाट्याच्या दोन प्रयोगाचे दिग्दर्शन, नेपथ्य आणि स्टेज सजावट जतीन पाटील यांनी केले होते तर पंकज खांडेकर यांनी निर्माता म्हणून जबाबदारी पेलली होती.



या महानाट्यात एकूण 22 दृश्य असून भीमरावाचे पाळण्यात नाव ठेवण्याचा आनंददायक प्रसंग, विवाहाचा प्रसंग, रामजी बाबांचा मृत्यू, महाडच्या चवदार तळ्याच्या आंदोलनाचे दृश्य, मनुस्मृति दहन दृश्य, काळाराम मंदिराचे आंदोलन, महात्मा गांधी समवेतील येरवडा कारागृहातील आणि मनीभवन मुंबईतील दोन दृश्य, रमाईचा मृत्यू, शाहू महाराजांच्या समवेतील एक दृश्य, डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या समवेतील दृश्य, धम्मचक्र प्रवर्तनाचे एक दृश्य, वर्तमानपत्राच्या कार्यालयातील काही बोलके दृश्य, शेतकरी, मजूर, स्त्रियांचे प्रश्न, सिंचनाचे प्रश्न आणि राष्ट्र उभारणी संदर्भातले काही प्रसंग या महानाट्यात पाहायला मिळतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या काही अलक्षित, दुर्लक्षित पैलूंना लेखक डॉ. सुरेश खोब्रागडे यांनी विलक्षण उजाळा दिला आहे. भव्य तीन मजली रंगमंचावरून 100 कलावंत आणि 25 तांत्रिक सहायकांच्या भव्य संचात या महानाट्याचे लाखनी जि. भंडारा येथे दि.16 मे 2022 रोजी आणि पिंपरी /चिंचवड जि. पुणे येथे दि. 17 एप्रिल 2024 रोजी दोन प्रयोग सादर झालेले आहेत. या महानाट्यात दोन पोवाडे, पाळणा गीत, शीर्षक गीत, माता रमाईच्या मृत्यूचे शोकगीत, ओबीसी, शेतकरी आदीबाबतचे अतिशय उर्जादाई गीत, धम्मचक्र प्रवर्तन गीत, आणि महापरिनिर्वाण गीत अशी एकूण आठ नव्या चालीची आशयघन गीते या महानाट्यामध्ये आहेत. लोकनाट्याचा आधार घेत सूत्रधार आणि दोन साथीदारांच्या संवादातून प्रभावी रंगतदार संगीतमय दृश्यमालिकांचे प्रभावशाली सादरीकरण पाहताना चित्रपट पाहिल्याचा आनंद रसिकांना मिळतो. एकाच वेळेस प्रसंगानुसार संवाद, नृत्य, गीत- संगीताचे सादरीकरण पाहून रसिक मंत्रमुग्ध होतात आणि भारावून जातात. प्रख्यात कलावंतांच्या संचात हे महानाट्य अधिकच बहारदार झाल्याची आपल्याला प्रचिती येते. महाराष्ट्रातील थोर गायक प्रा. अनिलकुमार खोब्रागडे, अंकिता टकले, मंजिरी वैद्य आणि वीरेंद्र बोराडे यांनी गीत गायन केले असून विकास बोरकर आणि भूपेश सवाई यांनी संगीत संयोजन केले आहे तर येथील गीतांचे गीतकार आणि संगीतकार म्हणून कीर्तीनंद G. यांनी सौंदर्यपूर्ण आशयघन शब्दांची निर्मिती करून रसिकांना मंत्रमुग्ध केले आहे. येथे भावपूर्ण मनमोहक नृत्यांचा नजरांना, महागड्या स्पॉटलाइट्स, महागडे साउंड इफेक्ट, साजेसे नेपथ्य, आणि पात्रांचा कसदार अभिनय यामुळे सतत चार तास रसिकांना खिळवून ठेवण्याची किमया साध्य करता आल्याचे दिसून येते. भगवान सुखदेवे, अनिता नंदागवळी, डॉ. युवराज मोडघरे, डॉ. युवराज खोब्रागडे अशा काही मान्यवरांच्या सहकार्यातून हे महानाट्य उभारता आले. आता लेखक डॉ. सुरेश खोब्रागडे या महानाट्याला नाटकाच्या स्वरूपात नव्या पद्धतीने कमी खर्चात, कमी संचात रंगभूमीवर आणत असून तीन तासात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवनपट रसिकांसमोर मांडणार आहेत. महागड्या महानाट्यापेक्षा साध्या, नियमित रंगभूमीवरून कमी संचात, कमी खर्चात जास्तीत जास्त लोकांपर्यंत डॉ. बाबासाहेबांचे जीवन मांडण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. दिग्दर्शन आणि नेपथ्यही ते स्वतः करणार असून ही नवीन निर्मिती तितकीच रसिकांना मंत्रमुग्ध करणारी ठरणार आहे. त्यांच्या या नव्या नाट्यपर्वाप्रति आणि नव्या प्रयत्नांप्रती मंगल कामना करूया, शुभेच्छा देऊया. ■ ■





समीक्षा



दिनेश कोटांगले
मो.9834492541

## विसावली रमाई

विसावली रमाई रे
किती राबतां राबतां
सारलया अंधःकार
ओझं पेलतां पेलतां ॥1॥
शिक्षणाची लई ओढ
भीमा विदेशी धाडतां
काढलेया दिन रातं
गौऱ्या थापतां थापतां ॥2॥
झाली भीमाची संगिनी
आई दुबळ्यांची माता
संसाराला ठिगळाचे
जोड शिवतां शिवतां ॥3॥
कोसळलं आभाळही
दु:ख झेलतां झेलतां
अश्रू आटले नयनी
पिलं गाडतां गाडतां ॥4॥
करपून गेली माय
पोळी शेकता शेकता
कंठी नाही चार मनी
सोनं आमुचं करतां ॥5॥
झुरे लेकरांची चिंता
क्षण अखेरचा येतां
माय म्हणे सांभाळाहे
श्वास सोडतां सोडतां ॥6॥

रजनी प्रभु फूलझेले



काव्यफुले
संयोजक : प्रा. भीमराव गायकवाड
मो. 9822507225
बहुजन सौरभ

## उखाणा

विखुरले गंध रंगात, मिसळले रंग पाण्यात
सुर, लय, ताल सांभाळ, तुझ्या ओठींच्या गाण्यात ।।
अशी शिरशिरी चिंब ओली, उब देईल का देहाला,
सुर्य किरणे लपेटून घे, तुझ्या सर्द नहाण्यात ।।
आज या चंद्र रातीला, मला टाळू शकत नाही,
बहाणे शोध तू आता, नव्या तुझ्या बहाण्यात ।।
आजच्या मैफलीत मजवर, टाक उधळून खजिण्याला,
बिल्वराची मृदु किणकिण, तुझ्या कलदार नाण्यात ।।
तेव्हा तू घेतले नाही, लाजुनी शब्द ओंठावर,
आज निर्लज्ज एकांती, नाव घे तू उखाण्यात ।।

मिलिंद खैरकर

## संत कबीर...

ना मंदिर ना मस्जिद शोधली
मनातच देव पाहिला
जातपात कर्मकांड सोडून
मानवतेचा दीप पेटविला...
शब्द साधे सखोल अर्थ
अनुभवातून सत्य उलगडले
ढोंग नाटकं अंधश्रद्धेला
टोकदार प्रश्नांनी हादरवले...
सूत्रात न बांधता देवाला
जीवनात त्याला उतरवले
भुकेल्याला अन्न नग्नाला वस्त्र
हेच खरे भक्तीचे रूप ठरवले..
कबीर म्हणतो ऐक मानवा
शोधू नकोस कुठे देव दूर
स्वत:च्या अंतर्मनात पाहिलेस
तर मानवतेचा येईल पूर...

– मीनाक्षी दमयंती

## लागले विसरावयास

होतो जीवंत जोवरी,
नव्हता वेळ भेटावयास
उरले पार्थिव माझे,
केली गर्दी बघावयास ॥
असता जीवंत जोवरी,
टाळीत होते मला
प्रेम उफाळून आले त्यांचे
शव माझे बघावयास ॥
घालीत होते शिव्या,
समजुन, मला विरोधी
स्तुती सुमने त्यांची,
नव्हतो मी ऐकावयास ॥
होते ढाळीत अश्रू,
कलेवरावर जे माझ्या
त्यांनाच अता घाई,
प्रेत माझे उचलावयास ॥
वाटले होते मला,
अडेल माझे वाचून
चार दिवस नाही गेले,
लागले मला विसरावयास ॥

–चंद्रकांत सावळकर

## नववारीतली रमाई

कधी ढळला ना पदर डोईवरचा खांद्या खाली,
नववारीत शोभुन दिसे माझी रमाई माऊली.
साधा नेटका पेहराव जणू सादगी ची सावली,
नववारीत शोभुन दिसे माझी रमाई माऊली...1
सुती खणाची नववारी काठापदरी मोरपीसे,
साध्या रूपातली रमाई वात्सल्य मूर्ती दिसे.
करुणेचा झरा वाहे सदा तिच्या पदरा खाली.
नववारीत शोभुन दिसे माझी रमाई माऊली...2
मान मर्यादेची रमा आभाळागत तिचे मन,
स्वाभिमानी नववारी घाले सोगे जोडून जोडून.
थीगळाच्या संसारात विश्व मूर्ती साकारली.
नववारीत शोभुन दिसे माझी रमाई माऊली...3
शुभ्र पांढरी नववारी निळी आकाशी किनार,
त्रिशरणाची जरतारी पंचशीलेची झालर.
कुशल चित्त जपे रमा,नित्य पावलो पावली.
नववारीत शोभुन दिसे माझी रमाई माऊली...4

-चित्तरंजन चौरे

## सावित्री

तुझ्या महतीची कशी गाऊ गाथा
तुझ्याविना अधुरी आमची व्यथा
पेटवूनी आमच्यासाठी क्रांतीची ज्योत
दूर करुनी अज्ञानाचा काळोख
शेण गोळ्याचे तू वार सोसले
वेदनेतही आनंद मानले
समाजासाठी करी ना परवा जीवाची
वाटेवरील काटे झेलत अपमानाची
निर्भिड धाडसी अशी तूच एक
फेडणार नाही तुझे उपकार अनेक
शिक्षणाची तू वाघीण होऊन
साक्षरतेचा आम्हा दूध पाजून
खांद्याला खांदा लावून ज्योतिबाला
सुरू केली मुलीसाठी पहिली शाळा
सती प्रथा अंधश्रद्धा तू तुडवून लावली
विधवा केशवपण अन बाल हत्या रोखली
साऱ्या ब्राह्मणवादाला तू धुळीस लावले
अन्यायाविरुद्ध तू लढण्या शिकविले
स्त्री दाश्यातून आम्हा मुक्त केले
अनाथासाठी आपुले प्राण झोकले
उपकार तुझे फेडता किती फेडावे
पुण्याई तुझी आम्हा जीवन जगणे शिकविले.

ज्योत्स्ना बनसोड

## नशीबाचा खेळ

नशीबाचा खेळ आहे
जरी श्रीमंत कंगाल
चाले सत्र घटनांचे
जुनी निसर्गाची चाल
हवी जोडणी कष्टाची
तेव्हा चमके ललाट
मागे यश खाटेवरी
त्यास दु:खाचीच लाट
दैव जाणेना कुणीही
सुदैवच कर्मावरी
हसू नये राव रंका
गर्व नको धनावरी
होई विधिलिखितच
वाटे प्रारब्ध प्राक्तन
तकदीरा मान्य घडे
मृत्यू कवटाळे तन
सिद्धार्थाचे भाग्य वदे
येता ते आसितमुनी
जपा कितीही पुत्रास
आहे वैराग्य जीवनी
रामायणी मंथराने
राम राजा धोका देता
वनवासी शिक्षा भोगे
भाग दैवाचाच होता
बिरबल चतुरच
नव्हताच राजयोग
अकबर होता नृप
नशिबात स्वर्णयोग
नसे हस्तरेषा ज्यांना
ठेवी कार्यात विश्वास
जिद्दीनेच स्वप्न पुर्ण
इच्छा पंख भरे श्वास
नाही मोल हिरे मोत्या
देह जळताच खाक
उरे कर्म मनुष्याचे
हद्दा वस्त्र बने राख

डॉ. शील बागडे



**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा खापरखेडा नागपूर.**

स्वाभिमानाचे स्मरणशिल्प -७९

नागपूर जवळ खापरखेडा हे उपशहर असून नागपूर जिल्ह्यातील खापरखेडा येथे विद्युत केंद्र आहे येथे लोक समुह पूर्वीपासून आर्थिक दृष्ट्याही बरा आहे मुख्य रस्त्याच्या बाजूने डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा आणि त्यागमूर्ती आईसाहेब रमा भिमराव आंबेडकर यांचा पुतळा उभारण्यात आलेला आहे येथे मोठ्या प्रमाणावर कार्यक्रम होतात.

संवाद मित्र, कपिल नारनवरे
9370773608

# बुद्ध विहार समन्वय समितीद्वारा बुद्ध विहारांचे चौथे राष्ट्रीय अधिवेशन शनिवार-रविवारला

**नागपूर :** बुद्ध विहार समन्वय समितीद्वारा आयोजित बुद्ध विहारांचे चौथे राष्ट्रीय अधिवेशन शनिवार रविवार दि. 28 फेब्रुवारी आणि 1 मार्च, 2026 रोजी शहीद जनरल अरूण कुमार वैद्य टाऊन हॉल, उल्हासनगर, 3 जिल्हा ठाणे, कोंकण विभाग मध्ये आयोजित करण्यात आले आहे.

अखिल भारतीय भिक्खू संघाचे कार्याध्यक्ष पूजनीय डॉ. भदंत उपगुप्त महास्थविर (पूर्णा जिल्हा परभणी) हे अधिवेशनाचे अध्यक्ष राहणार आहेत.

अधिवेशनाचे उद्घाटन, कामगार नेते आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (सेक्युलर) चे राष्ट्रीय अध्यक्ष शामदादा गायकवाड करतील. मुख्य अतिथी भारतीय बौद्ध महासभा राष्ट्रीय कार्याध्यक्ष डॉ. भीमराव यशवंतराव आंबेडकर राहतील.

अतिथी म्हणून महाबोधी बुद्ध गया मुक्ती आंदोलन नेते आकाश लामा, तामिळनाडू बौद्ध नेते जी. मोहनन, राजस्थानचे विचारवंत भेरुलाल नामा, बुद्धीस्ट समाज संघाचे संस्थापक अध्यक्ष उमेश नागदिवे राहतील.

दिल्ली विद्यापीठ दिल्लीच्या प्रोफेसर डॉ. हेमलता महिश्वर महिला चर्चासत्र, पणजी (गोवा) येथील संबोधी ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. उल्हास आंबेडकर (चांदेलकर) हे युवा सत्राचे, ठाणे येथील समन संघाचे राजेश कांबळे हे डिस्कशन प्यानलचे, बुद्ध विहार समन्वय समितीचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रा. घनशाम धाबर्डे हे प्रतिनिधी सत्राचे, राष्ट्रीय अध्यक्ष अशोक सरस्वती बौद्ध हे समारोप सत्राचे अध्यक्षपद भूषवणार आहेत.

बुद्ध विहाराचे समन्वयात महिला, युवक, युवती, धम्म प्रचारक, विचारवंत यांची भूमिका या विषयावर चर्चा होईल. मुंबई येथील आय. आर. एस. डॉ. पल्लवी दराडे, भावनगर गुजरात येथील डॉ. रंजना वांडकर, जिल्हा परिषद माजी अध्यक्ष बैतूल येथील स्नेहलता चौकीवर, दिल्ली येथील शिला जांभूळकर, केरळ येथील मृदुला देवी, कोंकण मधील डॉ. रंजना घनशाम तळवटकर, सेवानिवृत्त जिल्हा सत्र न्यायाधीश मुंबईच्या सुधा मनवर, सुधा मोहिले, नंदा वंजारे, प्रा. झेबा शेख, कल्याणच्या डॉ. अनुप्रिया खोब्रागडे, घारगर रायगडच्या डॉ. मिता गंगावणे, पुण्याच्या छाया डोये, रंजना भागवत, उल्हासनगरच्या माधुरी भालेराव सहभागी होतील. अमरावतीचे रमेश कटके, डॉ. रवींद्र मुंद्रे, डॉ. पल्लवी दराडे, नाशिकच्या प्राचार्या विशाखा कसबे, मुंबईचे डॉ. अक्षम आंबेडकर, प्रा. राहुल राव, उस्मानाबादचे डॉ. सुधीर कांबळे हे प्यानल डिस्कशनमध्ये राहतील.पुणे येथील राहुल खांडेकर, वनश्री वनकर, दिल्ली येथील सुप्रीम कोर्ट वकील ॲड. अभिषेक राज सिंग, टीसच्या स्कॉलर प्रांजली कुरील, सासाराम बिहारच्या कुमारी प्रीती, चेन्नई तामिळनाडूचे डॉ. भारती प्रभू, नागपूरच्या सुविता लोखंडे, नाशिकचे प्रबुद्ध खरे, संभाजीनगरचे प्रा. भारत शिरसाट, अमरावतीचे देवेंद्र खांडेकर, मुंबईचे अमोल बोधिराज, उल्हासनगरचे प्रा. राजेश सोनवणे सहभागी होतील.



प्रतिनिधी सत्रात हरियाणाचे देवी दयाल बौद्ध, पंजाबचे गुरूप्रसाद, आसामचे राम बहादुर लामा, ओरीसाचे जयंत नागरत्न, नागालँडचे परिमल बरुवा, त्रिपुराचे प्रदीप चकमा, बंगालचे भास्कर विजय, दिल्लीचे बनवारी लाल, राजस्थानचे कैलाशचंद खाडिया, बिहारचे विनोद कुमार बौद्ध, तेलंगणाचे राजेंद्र कुमार नरहरी, मध्य प्रदेशचे बी. के. खातरकर, उत्तर प्रदेशचे डॉ. शशिकांत सिंग, तामिळनाडूचे सुब्रम्हणी, महाराष्ट्राच्या मेहेरा गायकवाड, विदर्भातून त्र्यंबक ढोके, अशोक टेंभरे, मराठवाडा विभागातून एन. जी. खंदारे आणि प्रा. भारत शिरसाट, उत्तर महाराष्ट्र मधून जी. बी. पवार आणि आचार्य राजेंद्र भालशंकर कोंकण मधील धरमदास डवले आणि सदानंद जाधव, नागपूरचे पुरातत्व संशोधक डॉ. मधुकर कठाने, धम्म प्रचारक विभागाचे विश्वनाथ लोखंडे, बाल संस्कार विभागाचे सतीश गायकवाड, मॅरेज ब्युरो विभागाचे सिद्धार्थ लोखंडे, पालि भाषा परीक्षा नियंत्रक प्रा. आनंद वासनिक, कोषाध्यक्ष व्ही. पी. वाघमारे, कार्यालय संचालक आणि जापानी भाषा प्रशिक्षण विभाग प्रमुख ए. के. पाटील हे प्रतिनिधी सत्रात प्रतिनिधित्व करतील.

पालि भाषा परीक्षा संरक्षक नरेंद्र बावनगडे पुरस्कार वितरण करतील. अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष मुंबई विभागातील सुरेश त्रिभुवन गुरुजी, ठाणे कल्याण उल्हासनगर विभागातील डॉ. चंद्रकांत साळवे हे स्वागताध्यक्ष आहेत. मुख्य संयोजक महेंद्र बुद्धरत्न (बारसागडे), मेहेरा गायकवाड, स्मिता खैरनार, धरमदास डवले, सिद्धार्थ साळवे, सदानंद जाधव, दिगंबर हजारे, अशोक पंडागडे, पारीशनाथ जगताप हे असून त्यांना मार्गदर्शन करा यासाठी राजेश कांबळे, डॉ. पल्लवी दराडे, उमेश नागदिवे, आय. एम. मोरे, अण्णासाहेब रोकडे, ॲड. प्रकाश मौर्य, राजाराम पाटील, नागसेन सोनारे, डॉ. अशोक सूनतकरी, डॉ. यशोधरा वराळे, ॲड. अरविंद सोनटक्के, राजेश पाटील, निळे गुरुजी हे मार्गदर्शक आहेत. मुख्य आयोजक अशोक सरस्वती बौद्ध यांचे नेतृत्वात शंभर कार्यकर्त्यांची आयोजन समिती अधिवेशन यशस्वी करण्यासाठी परिश्रम करीत आहेत.

## महत्वाचे

### नशाबंदी मंडळ व अंनिसचे सहकार्य फलश्रृत

**नागपूर :** नागपूरतील अवैध तंबाखू, गुटखा व तंबाखूजन्य पदार्थ यांचे अंदाजे 35 लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करून आज येथील भांडेवाडी डम्पिंग यार्ड येथे नष्टीकरण करण्यात आले. यावेळी डीसीपी निकेतन कदम, पीएसआय सचिन धात्रक, पोलीस निरीक्षक कार्तिक बोराडे यांच्या नेतृत्वामध्ये बरेच पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचारी यांच्या उपस्थितीमध्ये डंपिंग यार्ड मध्ये जप्त केलेला मुद्देमाल क्रश करून बुजविण्यात आला. यावेळी पलोटी महाविद्यालय, स्वराज पब्लिक स्कूल येथील 200 विद्यार्थ्यांना व्यसनमुक्तीचा संकल्प देण्यात आला. नशाबंदी मंडळाचे पोस्टर प्रदर्शन मोठ्या प्रमाणात लावण्यात आले. हे पोस्टर उपस्थितांचे लक्ष आकर्षित करीत होते. यावेळी तंबाखू है मौत की पुडिया.. छुडा देती है जल्दी दुनिया, दूध पीना शुरू करो, शराब पिना बंद करो, एक दो एक दो, बिडी सिगारेट फेक दो, नो विस्की, नो बियर, हॅपी न्यू इयर, हॅप्पी न्यू इयर, या घोषणांनी परिसर दुमदुमला होता.यावेळी सामाजिक कार्यकर्ते मुकुंद वझरवार, प्रेम घरडे, महा. अंनिस चे कोराडी शाखा अध्यक्ष ताराचंद पखिडे सोबत होते. या कारवाईमध्ये वैशिष्ट्य म्हणजे नशाबंदी मंडळाचे जिल्हा संघटक तथा महाराष्ट्र अंनिसचे जि. कार्याध्यक्ष गौरव आळणे, ताराचंद पखिडे यांनी पंचनाम्यावर पंच म्हणून स्वाक्षरी केली.



### अंधश्रद्धेविरोधात वैज्ञानिक दृष्टिकोनाची मशाल चैतवा - महा. अंधश्रद्धा निर्मूलन समिती

**चंद्रपूर :** महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, यांच्या वतीने सोमवार, दि. 02 फेब्रुवारी 2026 रोजी बोर्डा, दुर्गापूर, गिलबिली, केळझर व जानाळा येथील शासकीय व अनुदानित आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी विशेष प्रबोधन कार्यक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे व बुवाबाजी, अंधश्रद्धा यांविरुद्ध जनजागृती करणे हा होता. कार्यक्रमात विद्यार्थ्यांना अंधश्रद्धांचे दुष्परिणाम, चमत्कारांच्या नावाखाली होणारी फसवणूक, तसेच विवेक, तर्क व विज्ञाननिष्ठ विचारांचे महत्त्व सोप्या व प्रभावी उदाहरणांतून समजावून सांगण्यात आले. प्रश्न विचारा, कारण शोधा आणि अंधविश्वासाला बळी पडू नका असा संदेश देण्यात आला. यावेळी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य कार्यकारिणी सदस्य रामभाऊ डोंगरे, विनायक रामटेके (उपाध्यक्ष, तालुका शाखा मूल), छाया सोनटक्के (बल्लारशा), मारोतराव रायपुरे (चंद्रपूर), दिलीप गेडाम (अध्यक्ष मूल शाखा), बांबोडे (सेवानिवृत्त मुख्याध्यापक, मूल) आदी उपस्थित होते. तसेच अविनाश टिपले (जिल्हा कार्याध्यक्ष, चंद्रपूर), किशोर तेलतुंबडे, गंगा हस्ते यांचीही कार्यक्रमाला विशेष उपस्थिती होती.



## आजचे कार्यक्रम

### बी. आर. एस. पी. ची आज विदर्भस्तरीय कार्यकर्ता बैठक

नागपूर : बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीची विदर्भस्तरीय पदाधिकारी कार्यकर्ता बैठक रविवार दि. 8/2/2026 ला रवी भवन मिटिंग हॉल नागपूर मध्ये ठेवण्यात आली आहे.

मुख्य मार्गदर्शक, ॲड. डॉ. सुरेश माने मार्गदर्शन करतील.

### तथागत बुद्ध विहार काशीनगर, नागपूर.

वेळ : रविवार दि. 8 फेब्रुवारी 2026 ला सायं 6.00 वाजता.
विषय : त्यागमुर्ती रमाई यांच्या जयंती निमित्ताने.
स्थळ : तथागत बुद्ध विहार, काशीनगर.

## आंबेडकराईट मुव्हमेंटचे साहित्य पुरस्कार जाहीर

**नागपूर :** आंबेडकराई मुव्हमेंट ऑफ कल्चर ॲण्ड लिटरेचर या संस्थेच्या वतीने दरवर्षी आंबेडकरनिष्ठ दलित साहित्यातील उत्कृष्ट साहित्यकृतींना राज्यस्तरीय वाङ्मय पुरस्कार दिले जातात. संस्थेच्या पुरस्काराचे हे अकरावे वर्ष आहे. साहित्य आणि सामाजिक चळवळीत आजीवन भरीव योगदान देणाऱ्या ज्येष्ठ साहित्यिकास 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर जीवनगौरव' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते. यावर्षीचा जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ लेखिका 'आयदानकार' उर्मिला पवार (मुंबई) यांना जाहीर झाला आहे. उर्मिला पवार या प्रखर सामाजिक जाणिवेतून लेखन करणाऱ्या चिंतनशील लेखिका आहेत. त्यांचे आयदान हे आत्मकथन प्रचंड गाजले असून ते इंग्रजी, हिंदी, तमिळ आणि कन्नड भाषेत अनुवादित झाले आहे. अमेरिकेच्या कोलंबिया विश्वविद्यापीठात 'आयदान' अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आले आहे. सहावे बेट, चौथी भिंत, हातचा एक या त्यांच्या कथासंग्रहांनी समाजमन ढवळून निघाले. निळे आकाश सोबतीला, कोकणातील दलितांचे रितीरिवाज आणि लोकगीते, डॉ. आंबेडकर जीवन कालपट, दलित लेखिका आणि त्यांचे साहित्य,



आम्हीही इतिहास घडवला. या पुस्तकांनी एकूणच मराठी साहित्याचे दालन समृद्ध केले. उर्मिला पवार यांनी मॉरिशस, नेपाळ, स्विडन, इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, स्वित्झर्लंड आदी देशात साहित्यिक चर्चासत्रात सहभाग नोंदविला आहे. त्यांच्या कार्य कर्तृत्वाचा सन्मान व्हावा म्हणून आंबेडकराई मुव्हमेंट ऑफ कल्चर ॲण्ड लिटरेचरने त्यांना जीवनगौरव पुरस्कार जाहीर केला आहे.

संस्थेने इतर राज्यस्तरीय साहित्य पुरस्कारांचीही घोषणा देखील केली. त्यात वसंत मून वैचारिक - संशोधन पुरस्कार प्रा. डॉ. अनिल गजभिये (इंदौर) यांच्या 'दलित साहित्य विचार - विमर्श' या पुस्तकासाठी जाहीर झाला आहे. बाबुराव बागूल कथा - कादंबरी पुरस्कार विलास अंभोरे (वाशीम) यांच्या 'युद्धलिपी' या कथासंग्रहास जाहीर झाला आहे. दया पवार आत्मकथन पुरस्कार अर्जुन व्हटकर (सोलापूर) यांच्या 'चलबट' या आत्मकथनास तर नामदेव ढसाळ काव्यपुरस्कार लोकनाथ यशवंत (नागपूर) यांच्या '...हे तर होणारच होते' या कवितासंग्रहास जाहीर झाला आहे. भगवान दास हिंदी दलित साहित्य पुरस्कार मुसाफिर बैठा (पाटना) यांना जाहीर झाला आहे.

संस्थेच्या निवड समितीने हे पुरस्कार नुकतेच जाहीर केले. दहा हजार रुपये रोख, शाल, स्मृतीचिन्ह आणि सन्मानपत्र असे जीवनगौरव पुरस्काराचे स्वरूप आहे. तर प्रत्येकी पाच हजार रुपये रोख, शाल, स्मृतीचिन्ह व सन्मानपत्र असे इतर वाङ्मय पुरस्कारांचे स्वरूप आहे. हा पुरस्कार वितरण समारंभ शनिवार दि. 07 मार्च रोजी सायंकाळी 5.30 वाजता 'मधुरम' सभागृह, हिंदी मोरभवन, सीताबर्डी नागपूर येथे मान्यवरांच्या हस्ते पार पडले. संस्थेचे दादाकांत धनविजय, भूपेश थुलकर, डॉ. मच्छिंद्र चोरमारे, डॉ. सविता कांबळे, पल्लवी जीवनतारे, महेंद्र गायकवाड, राजन वाघमारे, डॉ. सुरेश वर्धे, रमेश सोमकुवर, गौरव थुल, सुमेध कांबळे आदींनी पुरस्कार प्राप्त साहित्यिकांचे अभिनंदन केले आहे.

## आई रमाई जयंती निमित्ताने उत्तर नागपूरातील सर्व नगरसेवक यांचा आज सत्कार

**नागपूर :** आई रमाई यांचे संपूर्ण जीवन संघर्ष, त्याग व सेवाभावाने ओतप्रोत भरलेले होते. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी डॉ. बाबासाहेबांच्या कार्याला अखंड पाठबळ दिले. संसार, संतती, दारिद्र्य, सामाजिक उपेक्षा व आजारपण अशा असंख्य संकटांना तोंड देत त्यांनी सामाजिक परिवर्तनाच्या लढ्याला बळ दिले. त्यांचे जीवन हे प्रत्येक स्त्रीसाठी प्रेरणास्त्रोत असून, समतेच्या लढ्यातील मौन तपस्विनी म्हणून त्यांचे कार्य सदैव स्मरणात राहील. या कार्यक्रमांद्वारे आई रमाई यांच्या विचारांचा प्रसार होऊन समाजात समता, बंधुता, न्याय व मानवतेची मूल्ये अधिक दृढ होतील, याच भावनेतून लोकशाहीच्या या पवित्र प्रक्रियेत प्रभागातील नागरिकांनी दाखविलेला विश्वास, प्रेम व पाठिंबा हा आमच्या लोकप्रतिनिधींच्या सामाजिक बांधिलकीची, प्रामाणिक सेवेची व जनहिताच्या कार्याची पोचपावती आहे. समाजहितासाठी सतत कार्यरत राहण्याची त्यांची तळमळ, विकासाभिमुख दृष्टीकोन व सर्वसामान्यांच्या प्रश्नांप्रती असलेली संवेदनशीलता यामुळेच हा विश्वास सार्थ ठरला आहे. त्या अनुषंगाने नॉर्थ नागपूर महिला फोरम, नॉर्थ नागपूर सिनीयर सिटिझन फोरम व युवा ग्रॅज्युएट फोरमच्या वतीने, महानगरपालिका निवडणुकीत उत्तर नागपूरातील प्रभाग निहाय बहुमताने विजयी झालेले विविध पक्षाचे लोकप्रिय, कर्तव्यदक्ष व लोकाभिमुख नगरसेवक यांचा जाहीर सत्कार समारंभ रविवारी दि. 8 जानेवारी रोजी सकाळी 9.30 वाजता नागोराव पाटणकर बाल उद्यान येथील खुले सभागृह,



पाटणकर चौक नागपूर येथे आयोजित करण्यात आला असून जेष्ठ पत्रकार प्रमोद काळबांडे यांच्या अध्यक्षतेखालील आणि आसीनगर झोन, मंगळवारी झोन, सतरंजीपूरा झोनचे उपायुक्त उपस्थित राहणार आहेत. नवनियुक्त नगरसेवक यांच्या विजयामुळे प्रभागातील सर्वांगीण विकास, मूलभूत सुविधा, स्वच्छता, पाणीपुरवठा, रस्ते, शिक्षण, आरोग्य व सामाजिक उपक्रमांना नवी दिशा मिळेल, असा आम्हाला दृढ विश्वास आहे. या गौरवपूर्ण क्षणी त्यांचा जाहीर सत्कार करून कृतज्ञता व्यक्त करणे, त्यांना भावी वाटचालीसाठी शुभेच्छा देणे व पुढील कार्यासाठी प्रेरणा देणे, हाच या कार्यक्रमाचा उद्देश आहे. तसेच आई रमाई यांच्या जयंती उत्साहात साजरी करण्यासाठी महिला फोरम तर्फे उत्तर नागपूरात पहिल्यांदाच रानमेवा महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. यात हिवाळ्यातील वाट्याण्याच्या शेंगा, सोला, हरभरा, उकडलेले बोर, शिंगाडे अशा विविध प्रकारची मेजवानी उपलब्ध करण्यात येईल. असे आवाहन महिला फोरमच्या उषा उके, नंदिनी गौतम, उषा जंगम, पल्लवी आटे, उषा वासनिक, नम्रता मोटघरे, गौतमी पानतावने, तसेच सिनीयर सिटिझन फोरमचे अश्विन बोरकर, नरेश साखरे, नरेश कोटांगले, अनिरुद्ध बोदेले, अशोक बोंदाडे, मोतीलाल नाईक यांनी केले आहे.

## मोहरी(चौ) येथे माता रमाई जयंती सोहळा साजरा

**पवनी :** माता रमाईचा त्याग, हिम्मत व अखंड साथ यामुळे डॉ. बाबासाहेबांना देशातील बहुजनांचा उद्धार करता आला. त्यांना विश्वभूषण बनविण्यात रमाईचे मोठे योगदान आहे असे सांगून रमाईमूळे डॉ. बाबासाहेब घडले असे प्रतिपादन राष्ट्रवादी कांग्रेसचे तालुकाध्यक्ष विजय सावरबांधे यांनी केले. ते मोहरी(चौ) येथे आयोजित त्रिदिवसीय माता रमाई जयंती उत्सव समारोहाच्या उद्घाटनप्रसंगी अध्यक्ष स्थानावरून बोलत होते. प्रज्ञा शील करुणा बहुउद्देशीय सामाजिक संस्था, गट ग्रामपंचायत व समस्त ग्रामवासी मोहरी ता. पवनी यांच्या संयुक्त विद्यमाने दि. 5 फेब्रुवारी रोजी त्रिदिवसीय कार्यक्रमाचे उदघाटन करण्यात आले होते. याप्रसंगी कार्यक्रमाचे उद्घाटक शैलेश मयूर तर अध्यक्ष म्हणून विजय सावरबांधे होते. प्रमुख पाहुणे म्हणून पंचायत समिती माजी सभापती सुनील जीवनतारे, पंचायत समिती सदस्य चंद्रशेखर पडोळे, संपादक मनोहर मेश्राम, सितकुर गेडाम, मधुकर जांगळे, अशोक गभने, मोहन लांजेवार, दिलीप सावरबांधे इत्यादी उपस्थित होते. विजय सावरबांधे पुढे म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जेव्हा उच्च शिक्षणासाठी विदेशात गेले तेव्हा रमाबाईंनी अत्यंत कठीण परिस्थितीत संसार सांभाळला. शेणी-गोवऱ्या वेचून प्रसंगी उपाशी राहून संसाराचा गाडा हाकला. पण डॉ. बाबासाहेबांच्या ध्येयात




कधीही अडथळा येऊ दिला नाही. चार मुले दगवल्याचा दु:खद प्रसंग त्यांनी एकटीने सोसला असे सांगून माता रमाईचा त्याग आजच्या महिलांनी स्मरणात ठेवावा असेही म्हणाले. कार्यक्रमाचे उद्घाटक सामाजिक कार्यकर्ते शैलेश मयूर यांनी डॉ. बाबासाहेबांच्या सामाजिक चळवळीत त्या केवळ पत्नी नव्हत्या तर एक भक्कम आधारस्तंभ होत्या. त्यांच्यामुळेच डॉ. बाबासाहेब बहुजनांच्या उद्धारासाठी व देशहितासाठी काम करू शकले असे सांगून प्रत्येकांनी त्यांची प्रेरणा घ्यावी असे म्हटले. याप्रसंगी उपस्थित मान्यवरांची समयोचित भाषणे झालीत. कार्यक्रमाचे संचालन एसटी वाहक बन्सोड यांनी केले. दरम्यान सांस्कृतिक कार्यक्रम, मोफत नेत्र तपासणी शिबीर, संगीतमय समाज प्रबोधन, बुद्ध-भीम गीतांचा संगीतमय कार्यक्रम आयोजित केला आहे. जनतेनी सर्व कार्यक्रमात हजेरी लावण्याचे आव्हान आयोजकांनी केले आहे.

## सिटूच्या आशा वर्कर यांनी केला मनपाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांचा घेराव

**नागपूर :** आशा व गटप्रवर्तक कर्मचारी युनियन (सी आय टी यु) नागपूर जिल्हा मधील शहरी आशा वर्कर यांनी 15 जानेवारी रोजी झालेल्या महानगर पालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये निवडणुकीचे दिवशी सकाळी सात ते सायंकाळी सात वाजेपर्यंत आशा वर्कर यांनी बूथ सांभाळण्याचे काम केले. बी एल ओ चे काम करणाऱ्या आशा वर्कर किंवा अंगणवाडी सेविकांसह इतर कर्मचाऱ्यांना त्वरित निधी वाटप करण्यात आला. परंतु त्या व्यतिरिक्त लावण्यात आलेल्या आशा वर्कर यांना आजपर्यंत कोणताही मोबदला देण्यात आलेला नाही. मतदान केंद्र स्थळी चहा, पाणी, जेवणाची सोय सर्वांकरता केली असल्यानंतर सुद्धा आशा वर्कर करता कोणतीही सोय केल्या गेली नाही. पगारी कर्मचारी असल्यानंतर सुद्धा इतरांना 900 ते 2500 रुपये पर्यंत मोबदला देण्यात आला. परंतु आशा वर्कर यांना अकाउंट मध्ये आम्ही तीनशे रुपये पाठवू असे सांगण्यात आले. ते सुद्धा आजपर्यंत मिळालेले नाही. संघटनेमार्फत निवडणुकीच्या तीन दिवस आधी मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांचे नावे प्रत्येक आशा वर्कर यांना एक हजार रुपये मोबदला देण्यात यावा. अशी मागणी केल्यानंतर सुद्धा महानगर पालिका प्रशासनाने त्यावर विचार केलेला नाही. त्यामुळे महानगर पालिका क्षेत्रात काम करणाऱ्या शेकडो आशा वर्कर आज मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक शेलोकर यांच्याबरोबर चर्चा करण्याकरता महानगर पालिका मुख्यालयात पोहोचल्या. निवडणुका संपल्या महापौर, उपमहापौर बनले. परंतु आशांचा मोबदला केव्हा मिळणार? व किती मिळणार? यावर निवडून आलेले नगरसेवक काही बोलायला तयार नाही. त्यामुळे स्वयंस्फूर्तीने आम्हाला 1000 रुपये प्रमाणे मोबदला त्वरित द्या. या मागणी करता शेकडो आशा वर्कर यांनी महानगरपालिका गाठली. आशा व गटप्रवर्तक कर्मचारी युनियनचे अध्यक्ष कॉ. राजेंद्र साठे यांना तात्काळ पाचारण करण्यात आले. कॉम्रेड राजेंद्र साठे यांनी महानगरपालिकेचे मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर, अतिरिक्त वैद्यकीय अधिकारी डॉ. नरेंद्र बहिरवार, सि पि एम डॉ. अश्विनी निकम, मुख्य लेखापाल निलेश बाभरे, आशा समन्वयक रेखा निखाडे यांच्यासोबत चर्चा करून वरील विषयावरील मार्ग त्वरित काढावा अशी मागणी करण्यात आली. चार महिन्यापासून आशा वर्कर यांचे मानधन थकीत असून विविध प्रकारे ऑनलाईन व ऑफलाईन कामाचा बोजा आशा वर्कर वर लागण्यात येत आहे. यावरही लक्ष वेधण्यात आले. त्यावर अधिकाऱ्यांनी राज्य व केंद्रांनी कोणताही निधी पाठवलेला नसून आमच्यावर राज्य व केंद्राकडून कामाचा ताण वाढत असून वरील काम आशा वर्कर कडून करून घ्या. अशी ताकीद केल्या जात असल्याचे बोलून दाखवले. आशा वर्करच्या विविध समस्यांवर आम्ही त्वरित तोडगा काढण्याचा प्रयत्न करणार असे अधिकाऱ्यांनी आश्वासन दिले.

## अमळनेर-चोपडा रेल्वे मार्ग सर्वेक्षणाचे भिजत घोंगडे? खान्देशच्या विकासार्थ रेल्वे स्वप्नाबाबत उत्कंठा वाढली

**डॉ.अनिलकुमार पालीवाल**

**चोपडा :** केंद्र सरकारच्या 'पीएम गती शक्ती' (PM Gati Shakti) अभियानांतर्गत खान्देशातील महत्त्वाच्या अशा अमळनेर-चोपडा रेल्वे मार्गाची चर्चा पुन्हा एकदा जोर धरू लागली आहे. 50 हजारांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेली शहरे रेल्वेने जोडण्याच्या धोरणामुळे चोपडा शहराचा रेल्वे नकाशावर येण्याचा मार्ग मोकळा झाला असला, तरी या मार्गाच्या 'प्रत्यक्ष सर्वेक्षणाला वेग कधी येणार?' असा प्रश्न आता नागरिक विचारू लागले आहेत.

**सर्वेक्षणाची सद्य:स्थिती काय?**

रेल्वेच्या प्राथमिक माहितीनुसार, अमळनेर ते चोपडा या साधारण 35 ते 40 किलोमीटरच्या मार्गासाठी यापूर्वी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी पातोंडा, चहार्डी आणि चोपडा परिसरात प्राथमिक चाचपणी (Feasibility Study) केली होती. मात्र, या प्रकल्पाला अंतिम तांत्रिक मंजुरी मिळून सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार होणे अद्याप बाकी आहे. रेल्वेच्या 2025-26 च्या नियोजन आराखड्यात या मार्गासाठी भरीव तरतूद झाल्यास सर्वेक्षणाच्या कामाला गती मिळण्याची शक्यता आहे.

प्रकल्प रखडण्याची कारणे आणि आव्हाने :- **भूसंपादन प्रक्रिया** :- अमळनेर आणि चोपडा या दोन्ही सुपीक तालुक्यांतून हा मार्ग जाणार असल्याने जमिनीचे अधिग्रहण करणे हे आव्हान असणार आहे.

**निधीची उपलब्धता :-** 'पीएम गती शक्ती' अंतर्गत अनेक मोठे प्रकल्प (उदा. जळगाव-जालना, मनमाड-इंदूर) पाइपलाइनमध्ये आहेत, त्यामुळे या छोट्या पण महत्त्वाच्या मार्गाला प्राधान्य मिळणे गरजेचे आहे.

**राजकीय पाठपुरावा :-** या मार्गासाठी स्थानिक खासदारांनी रेल्वे मंत्रालयाकडे सातत्याने पाठपुरावा केल्यास सर्वेक्षणाच्या निविदा लवकर निघू शकतात.

**मार्गाचे महत्त्व का आहे हा मार्ग गरजेचा?**

1. **व्यापारी उलाढाल :-** चोपडा हा शेतीमालाचा मोठा केंद्र आहे. रेल्वे आल्यास केळी, कापूस आणि अन्नधान्याची वाहतूक स्वस्त होऊन व्यापाराला चालना मिळेल.
2. **औद्योगिक विकास :-** चहार्डी साखर कारखाना आणि परिसरातील सूतगिरण्यांना कच्चा माल आणि उत्पादित माल वाहून नेण्यासाठी रेल्वे मार्ग वरदान ठरेल.
3. **कनेक्टिव्हिटी :-** चोपडा शहर रेल्वेने जोडले गेल्यावर भविष्यात हा मार्ग शिरपूर किंवा मध्य प्रदेशातील महत्त्वाच्या शहरांना जोडला जाऊ शकतो.
4. **पुढील पाऊल काय? :-** रेल्वे प्रशासनाने या वर्षात सर्वेक्षणासाठी निधी मंजूर केला, तर प्रत्यक्ष मैदानी मोजणी (Ground Survey) आणि माती परीक्षण यांसारख्या कामांना सुरुवात होऊ शकते. खान्देशातील जनता आता रेल्वेच्या या 'गती' कडे डोळे लावून बसली आहे.

खरे पाहता जळगाव जिल्ह्यात एकमेव चोपडा तालुक्यातील एकही गावाला रेल्वेची कनेक्टिव्हिटी नाही. इतर चौदा तालुक्यात कोणत्या ना कोणत्या गावात रेल्वे मार्ग व स्टेशन्स आहेत. वास्तविक चोपडा तालुक्यातील रेल्वे मार्ग मागणी ही एक्काहतर वर्षापूर्वीची आहे. पण राजकीय नेत्यांना याबद्दल थोडीही माहिती नाही व त्यांची अनभिज्ञता ही सर्वात मोठी शोकांतिका आहे.

1955 पासून मनमाड-इंदौर रेल्वे मार्गाची मागणी तत्कालीन उपमंत्री स्व. मधुकरराव चौधरी व जनसंघाचे नेते स्व. नानासाहेब उत्तमरावजी पाटील यांनी महाराष्ट्र विधिमंडळात उचलली व त्यावेळी राज्य आर्थिक सर्वेक्षणात औद्योगिक प्रगतीसाठी प्र. चि. शेजवलकर समितीने मनमाड-इंदौर रेल्वे मार्ग निर्माण प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठवत हा रेल्वे मार्ग उभारणीच्या कामास गती देण्यात यावी म्हणून मनमाड, मालेगाव, धुळे, अमळनेर, चोपडा, मार्गे सातपुडा पर्वत मार्गे मध्यप्रदेशातून आदिवासी बहुल क्षेत्रातील धावलीद, गोगाव, विस्टान मार्गे खरगौन पर्यंत नेण्यात यावा व तेथून प्रस्तावित खंडवा-दाहोद रेल्वे मार्गाला जोडत इंदौर व तेथून दाहोद पर्यंत रेल्वे मार्ग बनविण्याच्या प्रस्तावास तत्कालीन नियोजन आयोगाने खर्चाला मान्यता दिलेली होती. महाराष्ट्र विधानसभा मार्फत एका ठरावाद्वारे केंद्र सरकारचे लक्ष देखील वेधण्यात आले होते. धुळ्याचे माजी आमदार स्व. ग. द. माळी, स्व. सदाशिवराव माळी, स्व. प्रल्हादतात्या पाटील, स्व. माधवराव गोटू पाटील, स्व. माधवराव चौधरी, अनिल अण्णा गोटे, स्व. देशराजजी अग्रवाल, ज्येष्ठ पत्रकार स्व. द्वारकादास पालीवाल, माजी खासदार स्व. रामभाऊ म्हाळगी, स्व. श्रीकिसन अग्रवाल, आदींनी या रेल्वेच्या मागणीला तत्कालीन रेल्वे मंत्री स्व. मधु दंडवते यांच्याकडे लावून धरली. याबाबत धुळ्याचे खानदेश विकास परिषदेने त्यावेळी रेल्वे मागणी परिषदेचे आयोजन देखील केले होते. परंतु स्थानिक स्तरावर सत्ताधारी नेते कमजोर पडले. त्यांना चोपडा तालुक्यातील विकासाचे व्हिजन नसल्याचेच यातून दिसून येते. एव्हढेच नव्हे तर विद्यमान केंद्रीय मंत्री रक्षा खडसे यांनी देखील चोपडा त्यांच्या रावेर लोकसभा क्षेत्रात सतत तिन्ही टर्म लाखोच्या मताधिक्य देऊनही चोपडा तालुक्यातील विकासाचे पाया रोवणाऱ्या या रेल्वेच्या मार्गावर साधा ब्र शब्द देखील लोकसभेत किंवा सरकारकडे उच्चारला नाही. ही तालुका वासियांची खंत आहे. आजचे विरोधी पक्ष साठ वर्ष सत्तेत असताना निष्क्रिय ठरल्याने व तेव्हाचे रेल्वे मागणी करणारे आज गल्लीपासून दिल्लीपर्यंत सत्तेत असताना देखील गप्प असल्याचे दिसत आहे. चोपड्यात रेल्वे मार्ग यावा, ही खानदेशातील तत्कालीन विकास पुरुष, उद्योगपती दानशूर श्रीमंत प्रतापशेठ यांची तळमळ होती. पण अमळनेर चोपडा दरम्यान असलेल्या तापी नदीच्या पूल उभारणीचा खर्च सरकारला द्यायला तयार असतांनाही सरकारने प्रताप पूल नाव देण्यास मान्यता न दिल्याने हा रेल्वे मार्ग रखडला तो कायमचा, असे जुने जाणते आज ही बोलतांना दिसतात.

या रेल्वे मार्गाच्या कामाला गती आणण्यासाठी अनेकांनी भगीरथ प्रयत्न केले, पण खरी गती आली मोदी सरकारच्याच काळात. पण त्यातही चोपड्याकडे दुर्लक्ष झाले. पण उशिरा का होईना अमळनेर, चोपडा या रेल्वे मार्ग सर्वेक्षणाचे काम सुरू झाले होते. पण त्यातही खोळंबा आला असल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. यावेळच्या अर्थसंकल्पात देखील कोणतेही नियोजन दिसत नसल्याने चोपडा तालुक्यातील जनतेने तीव्र निषेध करत नाराजी व्यक्त केली असून केंद्र सरकारने अमळनेर चोपडा रेल्वे मार्गाचे सर्वेक्षण करण्यासोबत हा रेल्वे मार्ग पुढे चोपडा ते शिरपूरपर्यंत थेट मनमाड इंदौर रेल्वे मार्गाला शिरपूरहून जोडावा, अशी मागणी जोर धरत आहे. कारण जळगाव जिल्ह्यात इतर तालुक्यांच्या तुलनेत चोपडा तालुक्यातील जनतेला जास्त आवश्यकता आहे. यासाठी तालुक्यातील सर्वपक्षीय नेत्यांनी सर्व पक्षीय मतभेद विसरून विकासाच्या मुद्द्यावर रेल्वे मार्ग उभारणीच्या मागणीस पूर्णत्वास न्यावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## निधन वार्ता

### पुरुषोत्तम महादेव रामटेके



**नागपूर :** एसटी महामंडळाचे सेवानिवृत्त वाहतूक विभागीय अधिकारी पुरुषोत्तम महादेव रामटेके, राहणार मानेवाडा बेसा रोड, नागपूर यांचे दि. 6 जानेवारी 2026 ला हृयविकाराचा झटका आल्याने रात्री 11.30 वाजता निधन झाले. मानेवाडा घाट येथे अंत्यसंस्कार झाले. त्यांच्या मागे बराच मोठा आप्तपरिवार आहे.

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648